# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७०**


MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ७ / जून २००३



## संपादकीय

### सार्स : एक भांबावलेपण

'सार्स' या श्वसन प्रकाराच्या रोगासंबंधी वृत्तपत्रे व अन्य प्रसिद्धी माध्यमांतून येणाऱ्या उलट सुलट बातम्या, ज्ञानात, माहितीत (आणि अज्ञानातही!) पदोपदी भर टाकणारे वर्तमानपत्रांचे रकाने यामुळे 'नेमकं काय चाललंय, का चाललंय आणि यातून पुढे काय' या आणि अशा प्रश्नचिन्हांच्या चक्रव्यूहात सामान्य माणूस नेहमीप्रमाणेच अर्जुनाचे भांबावलेपण अनुभवतोय ! जागतिक आरोग्य संघटना, केंद्रीय मंत्रिमंडळातील लोकप्रतिनिधी यांच्यापासून ते स्थानिक पातळीवरील कोणाहीपर्यंत 'सार्स' हा जीवघेणा रोग भारतात पसरत चालला आहे, अमूक शहरात इतके तर तमूक शहरात तितके रुग्ण सापडले, असे छातीठोकपणाने सांगतात काय अन् नंतर 'भारत देश सार्समुक्त आहे.' असेही सांगतात काय... साराच प्रश्नांच्या भोवऱ्यात अडकल्याचा प्रकार. एका वृत्तपत्रात तर अंबरनाथच्या 'त्या' रहिवाशाच्या घराचा परिसर स्वच्छ केला जात असल्याचे छायाचित्र होते तर दुसरीकडे दूरदर्शनवरून आरोग्य मंत्री वेगळेच काही सांगत होते!

'इराकचे पुढे काय झाले कोणास ठाऊक? तर सद्दामचा तर पुढे काही उल्लेखच नाही !' एक स्नेही सांगत होते, याचे कारण वृत्तपत्रांसकट सर्व माध्यमे सार्समय झाली होती. इंटरनेटवरही 'सार्स' बद्दलच्या माहितीचा महापूर होता.

दाटीवाटीने घराला घरे, इमारतीला इमारती लागून बकाल अवस्थेत जगणाऱ्या शहरी माणसांचं सुख दुःखांनी पिचणारं जीवन पाहिलं की 'सर्वे सन्तु निरामयः' या प्रार्थनेतलं बळच संपल्यासारखं वाटतं. नाना प्रकारचे रोग, नाना प्रकारचे प्रश्न माणसं जगत रहातात. भांबावून टाकणाऱ्या बावटळी येतात. त्या इतक्या भांबावून सोडतात की 'भांबावणं' ही सरावाचं झालंय !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ७ / जून २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टर्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जगन्नाथ पंडित | श्री. शंकर बा. मठ | ३ |
| २) | अभियांत्रिकी शिक्षणात पदविकेचे महत्त्व | श्री. सी. श्री. मुजुमदार | ८ |
| ३) | मॉर्निंग वॉक | सौ. वंदना प्रसादे | ११ |
| ४) | स्वामी विवेकानंद | नितीन धुरी | १३ |
| ५) | सावधान ! कारखाने बंद पडत आहेत. | सुयोग सुर्वे | १५ |
| ६) | श्रीमद्भगवत् गीता (अध्याय १५वा) ॥ पुरुषोत्तमयोग: ॥ | आशा भिडे | १८ |
| ७) | ग्रंथप्रेमी बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथालय | ग्रंथमित्र | २५ |
| ८) | लेखक नाम सूची | सौ. छाया मोहिते पल्लवे तडस | २९ |
| ९) | परिसरवार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# जगन्नाथ पंडित

*संस्कृतमधील अजरामर अशा 'गंगालहरी'चे कर्ते जगन्नाथ पंडित. १ जून ते ९ जून या अवधीत गंगा दशहरा आहे. त्यानिमित्ताने खास लेख - संपादक*

**जन्म :-**

पुण्यात्मे नेहमीच जनकल्याणाच्या इच्छेने पुनः पुनः या भूतलावर अवतरत असतात असा गीतेत उल्लेख आढळतो.

प्राप्य पुण्यकृतां ल्लोकान्, उषित्वा शाश्वती समा : ।
शुचीनां श्रीमतां गेहे योग भ्रष्टोऽ भिजायते ।

६.४१ (गीता)

अथवा योगिनां एव कुले भवति धीमतां ।
एतत् हि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ।

६.४२ (गीता)

अनुवाद - पुण्यवतांना मिळावयाच्या स्वर्गादी लोकाना जाऊन तेथे दीर्घकाळ राहून नंतर शुद्धाचरणी अशा श्रीमंत घराण्यात अशा योग भ्रष्ट पुरुष जन्माला येतो. (६.४१)

अथवा तो ज्ञानवान अशा योग्यांच्याच कुलात जन्माला येतो अशा प्रकारचा जन्म मिळणे हे या लोकी अतिशय दुर्लभ आहे. (६.४२)

पंडित जगन्नाथ या दुर्लभ व्यक्तिमत्वाचे होते.

**माता-पिता**

आंध्र प्रदेशातील वेगिनाडी विभागातील मुंगुंडा गांवी पेरम् भट्ट (पेरुभट्ट) या नावाचे तेलंगी ब्राह्मण रहात होते. ते आश्वलायन ऋग्वेदी शाखेचे होते. त्यांची कीर्ती दूरवर पसरलेली होती. ते संस्कृत पंडित होते. त्यांचे गोत्र कौंडिण्य होते. ते कर्तव्यदक्ष व अत्यंत लोकप्रिय होते. पेरमभट्टशांच्या पत्नीचे नाव लक्ष्मी होते. ती अतिशय सालस व सद्गुण संपन्न होती. पेरमभट्टशांचा संसार सुखाने चालला होता. शके १४७२ श्रावणमासी (ऑगस्ट १५५०) लक्ष्मी बाईंच्या उदरी एक बालक जन्माला आले. हे बालक म्हणजेच जगन्नाथ पंडित होय.

ह्या बालकावर सर्व संस्कार लहानपणापासूनच करण्यात आले. आठव्या वर्षी या बालकाची मुंज करण्यात आली. गायत्री प्रसन्न होण्यासाठी वडिलांनी त्याच्याकडून गायत्री पुरश्चरण करवून घेतले. माता-पित्यावद्दल जगन्नाथाला खूप आदर होता. जगन्नाथाला त्यांच्या वडिलाकडून व्याकरणाखेरीज सगळे संस्कृत शिक्षण मिळाले. वडिलांना ज्यांनी व्याकरण शिकविले त्यांच्याकडूनच संस्कृत व्याकरणाचे पाठ जगन्नाथाला मिळाले. पेरमभट्टाना विविध विद्या, विविध गुरुंकडून संपादन करावी लागली. जगन्नाथाला मात्र वडिलाकडूनच सगळी विद्या प्राप्त झाली. त्यांनी आपल्या वडिलांबद्दल गौरवोद्गार काढताना असे म्हटले की,

पाषाणादपि पीयूषं स्यन्दते यस्य लीलया ।
तं वन्दे पेरुभट्टाख्यं लक्ष्मीकान्तं महागुरुम् ।

अर्थ - पाषाणातून ही सहजगत्या अमृतरूपी मकरंद वाहावयास लावणारे, लक्ष्मीचे पती, पेरुभट्ट नावाचे जे श्रेष्ठ गुरु आहेत, त्यांना मी नम्रतापूर्वक वंदन करतो.

काव्य शास्त्रात जगन्नाथ निष्णात होते. 'रस गंगाधर' या काव्य शास्त्र ग्रंथात वरील श्लोक आढळतो. वेदान्त, तत्त्वज्ञान, जैमिनीय मीमांसा, पातंजल महाभाष्य (पाणिनीय व्याकरणावरील) इत्यादी ग्रंथांचे अध्ययन त्यांनी पूर्ण केले.

जगन्नाथ हा अतिशय तल्लख बुद्धीचा होता. त्यामुळे लहान वयातच हे महान् ग्रंथ त्यांनी वाचले.

यानंतर काहीच दिवसांनी त्याला मातृवियोग झाला. त्याच्यावर मातेचे निरतिशय प्रेम होते. मरणसमयी मातेने त्याला विशेष आशीर्वाद दिला.

**विद्वत सभेत बाळ जगन्नाथ -**

तिरुपतीचा राजा हरदेवराय यांनी एकदा विद्वत् सभा बोलावली. तेथे शिव आणि विष्णु या देवतांच्या श्रेष्ठत्वाबद्दल चर्चा झाली. जगन्नाथ त्या सभेला गेला होता. त्यावेळी तो केवळ तेरा वर्षांचा होता. तो त्या सभेत बोलला. 'एको देव: सर्वभूतेषु गूढ: ।' या जगात एकच परमेश्वर आहे. तो निर्गुण निराकार परमात्मा असून शिव अगर विष्णु ही त्याचीच साकार रूपे आहेत. तेव्हा श्रेष्ठ वा कनिष्ठ हा प्रश्नच उद्भवत नाही. हा विचार विद्वानांना आवडला. त्या सर्वांनी जगन्नाथाचे कौतुक केले. ही सभा या लहानग्या जगन्नाथाने जिंकली.

**विवाह -**

जगन्नाथाचे विवाह करण्याचे ठरले. सुमूहूर्तावर त्याचा विवाह झाला. पत्नीचे नाव भामिनी असे ठेविले. काही वर्षांनी त्यांना मुलगा झाला. त्यांचे नाव विनायक असे ठेविले. वडिलांच्या परवानगीने जगन्नाथ काही दिवस कर्नाटकचा दौरा करण्यासाठी गेले. मात्र तिथे त्यांना विशेष प्रतिसाद न मिळाल्याने ते परत स्वग्रामी आले. त्यांच्यावर दैवाची नाराजी झाली असेच म्हणावे लागेल. त्यांच्या प्रिय पत्नीला क्षयरोग झाला व त्याच्यातच तिचा अंत झाला. त्यांना अतिशय दु:ख झाले. त्यांची मन:शांती नष्ट झाली. त्यांना वडिलांनी पुन: विवाह करण्यासाठी आग्रह केला. परंतु त्या गोष्टीला त्यांनी ठाम नकार दिला.

**देवींची सेवा व प्रयाण -**

पत्नी गेल्यापासून नैष्ठिक ब्रह्मचर्य पालन व नेटाने उपासना सुरू केली. त्यामुळे त्यांचे तेजोवलय वाढत चालले. 'बाळा त्रिपुरसुंदरी' हिची आराधना केली. ती प्रसन्न झाली व तिने वर दिला, 'तू कुरु देशात जा, तुझे सारे मनोरथ पूर्ण होतील.' त्यांनी हा वृत्तांत वडिलांना सांगितला. वडिलांनी जगन्नाथाला कुरु देशात जाण्याची परवानगी दिली.

**कुरु देशाला प्रयाण -**

जगन्नाथ प्रथम जयपूरला आले. राज दरबारात गेले. तेथील राजा भगवानदास याने त्यांचे स्वागत केले. तो विद्वानांचा चाहता होता. जगन्नाथाची पारख झाल्यामुळे त्यांनी जगन्नाथाला राजाश्रय दिला. जगन्नाथांनी जयपूरला संस्कृत पाठशाळा सुरू केली. उत्तम शिक्षणामुळे अनेक विद्यार्थी तिथे शिकून निष्णात झाले. यामुळे जगन्नाथाची कीर्ती सर्वत्र पसरली.

जयपूरला जगन्नाथांची व एका काझीची गाठ पडली. हा काझी पर्शियन भाषेचा पंडित होता. त्याचा कुराण विषयक अभ्यास प्रचंड होता. शिवाय तो इस्लाम धर्माचा कट्टर अभिमानी होता. संस्कृत भाषा त्याला चांगली अवगत होती. जगन्नाथांना फारसी भाषा चांगली येत होती. काझीकडून धर्माची तत्त्वे समजावून घेतली. अनेकवेळा काझीशी चर्चा, वाद इत्यादी होत असत. जगन्नाथ मुळातच तरल बुद्धीचे. त्यामुळे इस्लाम धर्माची वैशिष्ट्ये त्यांना लवकरच अवगत झाली. वादात काझीला नेहमीच माघार घ्यावी लागत असे. येथे आपली डाळ शिजणार नाही हे काझीला पक्के कळले. म्हणून तो दिल्लीला निघून गेला. 'आपल्यापेक्षाही सवाई पंडित जयपूरला आहे, त्यांनी मला देखील जिंकले' ही माहिती काझीने अकबराला दिली.

**दिल्ली दरबारचे आमंत्रण -**

अकबर हाही विद्वानांचा चाहता होता. त्यांनी जयपूरला भगवानदासाकडे जगन्नाथाला पाठवून देण्याची मागणी केली. भगवानदास अकबराचा मंडलिक होता. शिवाय त्याची बहीण भानुमती हिचा विवाह अकबराशी

वैदिक पद्धतीने झाला होता. त्यांनी जगन्नाथरायाशी विचार विनिमय केला आणि त्याना दिल्ली दरबारात पाठविले.

तेथे जगन्नाथांचे यथोचित स्वागत करण्यात आले. अकबराने काझीशी इस्लाम धर्मावर चर्चा घडवून आणली. काझीने मांडलेले सर्व मुद्दे जगन्नाथांनी खोडून काढले. इतका विद्वान पंडित आपल्या दरबारी राहिल्यास अनायासे आपले कार्य साधता येईल असे बादशहाला वाटले. जगन्नाथ हे संस्कृत पंडित म्हणून दिल्ली दरबारी वावरू लागले. भानुमतीपासून अकबराला एक सुकन्या झाली. तिचे नाव भामिनी असे होते. ती अकबराची लाडकी असल्याने तो तिला प्रेमाने लवंगी असे म्हणे. ती मुलगी तरतरीत व निर्मल मनाची होती. तिच्या मनावर हिंदु संस्कार बिंबले होते. ती संस्कृत शिकत होती. रामाचार्य नावाचे एक विद्वान तिला संस्कृत शिकवत होते. रामाचार्यांकडून जगन्नाथ रायाची थोरवी तिला कळली. सभेत काझीला जिंकल्याचेही तिने ऐकिले होते. जगन्नाथांना केव्हा एकदा पाहीन असे तिला झाले. एकदा खास दरबार भरला असताना ती त्या दरबारात जगन्नाथाला पहात बसली. तिला त्याची ओढ लागली. तिने त्यांच्याशीच लग्न करावयाचे असे मनोमन ठरविले.

### अकबराच्या अपेक्षा -

जगन्नाथावर अकबर खूष होता. त्याला दोन गोष्टी साधावयाच्या होत्या. या विद्वानाकडून लवंगीला संस्कृत साहित्याचा खूप परिचय करून घेता येईल आणि हिंदू व इस्लाम या दोनही धर्मातील चांगली तत्वे एकत्र करून सर्व प्रजाजनात ऐक्य घडवून आणता येईल. एके दिवशी जगन्नाथ रायाना अकबरांनी विचारले. लवंगीने अद्याप किती संस्कृत ग्रंथ वाचले आहेत. जगन्नाथ म्हणाले, 'हा प्रश्न तिलाच विचारा.' लगेच लवंगीला बोलावून घेतले व तिच्या कडून अनेक ग्रंथांची यादी ऐकून अकबराला अत्यंत आनंद झाला. आणखीही त्याला एक कारण होते. त्यांनी लवंगीसाठी नियोजलेला इस्लाम धर्माचा पती तिला पसंत नव्हता. हिंदु पंडितच तिला पती म्हणून हवा होता. परंतु ते घडणार कसे याची विवंचना अकबराला होती. कारण धर्मांचा संबंध आड येण्याची शक्यता आहे, असे त्याला वाटत होते.

### जगन्नाथाला स्वप्न पडले -

जगन्नाथांना एकदा स्वप्न पडले व साक्षात देवी सरस्वती प्रगट झाली. तिने प्रसन्न चित्ताने जगन्नाथाला सांगितले. तुझी पूर्व पत्नीच पुन: अकबराच्या मुलीच्या रूपाने जन्मली आहे. तिच्याशी तू जरूर लग्न कर. ही देवीची वाणी ऐकून जगन्नाथराय विस्मित झाले आणि देवीच्या वाणीला रुकार देण्याचे ठरविले. इकडे लवंगी जगन्नाथाना कामानिमित्त वरचेवर भेटत असे. तिने आपल्यासाठी मागणी घालावी असे जगन्नाथाना वरचेवर सूचना करू लागली. बादशहाकडे ही गोष्ट कशी काढावी याची संधी जगन्नाथ पाहू लागले.

### समस्यापूर्ती -

अकबराला एकदा लहर आली. जगन्नाथ रायाकडून समस्यापूर्ती ऐकावी असे त्याला वाटले. त्याने निबेदरु व निमेबरु हे शब्द दिले. याचा अर्थ अर्धे बाहेर व अर्धे आत असा आहे. हे शब्द घालून काव्य म्हणून दाखवावे असे सांगितले. जगन्नाथाने तत्काळ एक श्लोक रचला व म्हणून दाखविला.

> धरा नरेन्द्र प्राणिषु प्रदातुमीहसे धराम ।
> यदि त्वं आदरात् तदैव देहि तत्फलम् ।
> पयस्विनी स्वलंकृता स्ववेशभूमि मुक्तिदाम् ।
> यदैव तत् शिशु: भवेत् निमेदरुं निमेबरुम् ।

हे पृथ्वीपते तुला जर भूमी दान करावीशी वाटते तर आदरपूर्वक ती दान कर व तसे फल प्राप्त करून घे. वीण अगदी सन्निध आलेल्या गाईचे सालंकृत तू दान कर आणि भूमी दान केल्याचे पुण्य पदरात पाडून घे जेव्हा तिला वासरू होत असेल त्यावेळी ते अर्धे बाहेर व अर्धे आत असेल अशा अवस्थेत असलेल्या गायीला पृथ्वी असे संबोधले जाते.', असा मत्स्य पुराणातील उल्लेखही केला.

हे ऐकून बादशहा खूप झाला त्यानी जगन्नाथाला पाहिजे ते मागावयास सांगितले. या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन जगन्नाथ म्हणाले -

न याचे गजालिं न वा बाजिराजिम् ।
न वित्तेषु चित्तं मदीयं कदाचित् ।
इयं सुस्तनी मस्तक न्यस्त कुंभा ।
लवंगी कुरंगी मदंगी करोतु ।

'खाविंद मी आपणाकडे हत्तीचे समूह मागत नाही वा घोड्यांचा समूह मागत नाही. मला कधीच धनाची अपेक्षा नाही. मात्र ही पुष्ट स्तनाची, जिने डोईवर कलश घेतला आहे अशी तुमची लवंगी माझा स्वीकार करो.'

पंडितरायाची ही मागणी बादशहानी मान्य केली. त्यांच्या लग्नात विघ्ने आणणारी खूप मंडळी होती. पण बादशहाने ती मोडून काढली. त्यात ब्रह्मवृंदही सामील झालेले होते. या सर्वांना न जुमानता जगन्नाथाला आपली कन्या दिली. काही काळ ती उभयता आनंदाने राहिली. कालांतराने अकबराचे निधन झाले. त्यांच्या नंतरही काही काळ ती उभयता दिल्लीला राहिली. जहांगीर, शहाजहान व दारा शिकोह हे त्यांचे चाहते होते. जगन्नाथांनी असे कौतुकाने म्हटले आहे, 'दिल्ली वल्लभ पाणिपल्लव तले नीतं नवीनं वय: ।' माझे तारुण्य वहुत करून मोंगल दरबारात गेले.

**ग्रंथ संपदा -**

त्यानी 'भामिनी विलास' लिहिला तसा 'असफ बिलासही' लिहिला. हा विलास त्यांनी राममुकुंद यांच्या सांगण्यावरून लिहिला असे म्हटले जाते. पंडितराय हा किताब राममुकुंदांच्या सांगण्यावरून शहाजहान याने जगन्नाथाना बहाल केला. असफ खान हा जगन्नाथाचा चाहता होता. नूरजहानचा हा भाऊ होता. तो शिकलेला होता आणि सौंदर्याचा शौकिन होता. तो १६४१ साली मरण पावला. त्याचे निधन झाल्यावर पंडितराय म्हणतात-

युक्तन्तु याते दिवं आसफैन्दी । तदा श्रितानां यत् अभूत् विनाश ।
इदन्तु चित्रं भुवनावकाशे निराश्रया खेलति तस्य कीर्ती: ।

'आसफ खान दिवंगत झाले. त्याच्यांवर आश्रित लोकांचे अतिशय नुकसान झाले हे योग्य आहे. परंतु ही एक गोष्ट अद्भुत आहे की त्याच्या आश्रयाशिवाय रिकाम्या जागेत त्याची कीर्ती सदैव क्रीडा करीत आहे. 'असफ खानाच्या मृत्यूनंतरही ते मोंगल दरबारी होते. तेथे त्यानी अनेक काव्य रचना केल्या. रस गंगाधर, चित्र मीमांसा खंडन, ग्रंथ व पाच लहरी लिहिल्या. रसगंगाधर हा ग्रंथ अपुरा आहे. अद्याप तो ग्रंथ कोणीही पूर्ण करू शकला नाही. मग काही काळ ते उभयता आसामला गेले असावे असे त्यांच्या प्राणाभरण या काव्यावरून वाटते. 'भामिनी बिलास' हे काव्य प्रथम पत्नीच्या बियोगानंतर लिहिले गेले आहे. संस्कृत साहित्यात एक अनमोल भर पडली आहे.

**वृद्धापकाळ -**

वृद्धापकाळी ते बनारसला गेले. संसाराचा संपूर्ण वीट येऊन त्यातील निष्फलता त्यांना भेडसावू लागली. भौतिक सुख नकोसे झाले. तेथे गेल्यानंतरही त्यांचा छळ झाला. श्री अप्पय्य दीक्षित हे त्यात प्रमुख होते. जगन्नाथ अत्यंत निराश होऊन गंगेच्या तीरी बसले व तिलाच आळवू लागले. त्यांची आर्तता पाहून गंगा प्रसन्न झाली व तिने पंडितराय जगन्नाथाना यवनीसह आपल्या उदरात घेतले. ते म्हणत

'अहं क्षेत्र संन्यासं गृहीत्वा काश्या स्थितोऽस्मि ।
अथ तां परित्यज्य अन्यत्र गन्तुं न शक्नोमि ।'

'मी सगळ्या क्षेत्रांचा संन्यास करून काशीत राहिलो आहे. ती जागा सोडून मला दुसरीकडे जाणे अशक्य आहे.

**एक थोर संस्कृत पंडित कवी -**

जगन्नाथ हे दक्षिणेकडील एक विद्वान ब्राह्मण.

त्यांनी आपले जवळ जवळ सर्व आयुष्य उत्तरेत घालविले. स्वत:च्या कर्तृत्वाने मोठेपण प्राप्त करून घेतले व मोंगल दरबारात स्वत:चा ठसा उमटविला.

जगन्नाथ हे थोर कवी होते. त्यांनी दीर्घ काव्ये वा नाटके लिहिली नाहीत परंतु पाच काव्य लहरी लिहून आपल्या मनातील भक्तिभाव त्यांनी प्रगट केला आहे आणि त्याद्वारेच त्यांना सद्‌गति प्राप्त झाली. संस्कृत थोर पंडितात जगन्नाथ हे शेवटचेच असावेत. त्यानंतर इतका मोठा संस्कृत पंडित झालेला आढळत नाही. परमार्थ सेवनात त्यांचा उत्तरार्ध गेलेला आहे. हे त्यांच्या काव्य लहरी वरून ध्यानात येते. ते म्हणतात. मन्निर्मिताश्च पञ्च लहर्य: भावस्य । भावपूर्ण अशा ह्या काव्य लहरी आहेत. याच लहरीत त्यांची स्पष्टपणे हृदयाला भिडणारी वाणी, काव्य शैली व सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आर्त भाव यामुळे ते एक श्रेष्ठ कवी झाले आहेत.

१) **सुधालहरी** - (एकूण ३० श्लोक - स्रग्धरावृत्त. यात शब्दचित्र व अर्थचित्र यांचा सुंदर मिलाफ आढळतो.

२) **अमृत लहरी** - १० श्लोक - भक्तियुक्त काव्य.

अयं पंडितराजेन श्री जगन्नाथ शर्मणा ।
स्तव: कालिन्दनंदिन्या निर्मलां निरमीयत ॥

यात यमुनेचे वर्णन आहे. एका श्लोकाच्या शेवटच्या ओळीत ते म्हणतात.

चारं चारं इत: तव तटे मुक्तो भवेदं कदा । वरचेवर तुझ्या तटावरून हिंडलो पण मला मुक्ती कधी मिळेल?

३) **लक्ष्मी लहरी** - ४१ श्लोक, शिखरिणी वृत्त - लक्ष्मीच्या अंग प्रत्यंगाचे वर्णन.

४) **करुणालहरी** - अथवा विष्णु लहरी - ४३ श्लोक वियोगिनी वृत्त. या लहरीत ते म्हणतात,

न धनं न च राज्यं संपदं । नहि विद्यां इदं एकं अर्थये ।

मयि धेहि मनागपि प्रभो । करुणा भाङ्गे तरंगिता दृशम् ।

हे परमेश्वरा मला धन नको राज्य नको ऐश्वर्य नको व विद्या (उपाना पद्धति) नको. तुला द्यावयाचे झाल्यास तुझा अपार करुणा तरङ्ग मला प्राप्त होवो.

कृष्ण याची व्याख्या करताना कृष्ण या दोन शब्दात मोक्षाचे द्वार अर्पण करताना म्हटले आहे.

५) **गंगा लहरी** - ही लहरी भक्तिभावाचा एक नमुना आहे हे एक अत्युत्तम काव्य आहे.

संस्कृत साहित्यात एक अजरामर कलाकृती आहे. यात ५२ श्लोक आहेत. शेवटच्या ५३ व्या श्लोकात फलश्रुति सांगितलेली आहे.

इमां पीयूष लहरीं जगन्नाथेन निर्मिताम् ।
य: पठेत् तस्य सर्वत्र जायन्ते सुख संपद: ।

गंगेकडून त्यांना उदार वागणूक मिळावी, मातेची उब प्राप्त व्हावी, अशी इच्छा या काव्यात व्यक्त करण्यात आली आहे. सर्व बाजूने त्यांच्यावर निषेधाचे काहूर माजले होते. फक्त गंगामाईकडून प्रेमाची अपेक्षा ते करताना आढळतात. गंगेचा जन्म विष्णूच्या चरण कमलातून झाल्यामुळे ती शारीरिक व मानसिक आधि व्याधि नष्ट करणारी आहे, अशी जगन्नाथांची खात्री होती.

कियन्त: सन्त्येके नियतमिह लोकार्थ घटका : ।
परे पूतात्मान: कति च परलोक प्रणयिन : ।
सुखं शेते मातस्तव खलु कृपात: पुनरयम् ।
जगन्नाथ: शश्वत् त्वयि निहित लोकद्वय पर ॥३६

अर्थ - हे माते या जगात काही लोक नेहमी परोपकार करून काही पवित्रात्मे बनून, परलोकाची इच्छा करतात. पण हे माते ज्याने तुझ्यावर सदा सर्वदा दोन्ही

(पृष्ठ १२ वर)

# '' अभियांत्रिकी शिक्षणात पदविकेचे महत्त्व''

*अभियांत्रिकी शाखेची पदवी मिळूनही बेकार असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अपरिमित आहे. त्या पार्श्वभूमीवर पदविकेचे शिक्षण कसे उपयुक्त आहे, हा विचार सदर लेखात व्यक्त झाला आहे. - संपादक*

जे विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या प्रगती करणारे आहेत त्यांच्याकडून अभियांत्रिकी शिक्षणास प्राधान्य दिले जाते. आपला मुलगा इंजिनिअर / डॉक्टर व्हावा ही प्रत्येक पालकाची इच्छा असते. या शिक्षणामुळे आयुष्यात खूप उत्कर्ष करण्याची संधी मिळू शकते. इंजिनिअरींगचे शिक्षण प्राप्त केल्यानंतर विद्यार्थ्यांना टेक्निकल मार्केटिंग, कारखान्यातील यंत्रसामुग्रीचे सर्व्हिसींग, प्रॉडक्शन, रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट इत्यादी वेगवेगळ्या क्षेत्रांत नोकऱ्या उपलब्ध होतातच याशिवाय ते उद्योजकही बनू शकतात.

इंजिनिअरींगची पदवी बहुतांश विद्यार्थी १० + २ +४ ह्या प्रकाराने घेतात. याचा अर्थ दहावी अधिक २ वर्ष १२ वी व पुढे ४ वर्ष अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण प्राप्त करणे. १२ वीची परीक्षा दिल्यानंतर ह्या विद्यार्थ्यांना मेडिकल, इंजिनिअरींग, आर्किटेक्चर, डेन्टल इत्यादी मार्ग स्वीकारता येतात. यापैकी आपण फक्त अभियांत्रिकी (इंजिनिअरींग) शाखेबद्दल सविस्तर विचार करणार आहोत. अभियांत्रिकी शाखेत विद्यार्थ्यांना १२ वी पास केल्यानंतर आय.आय.टी., एन.आय.टी. (पूर्वीची रिजनल इंजिनिअरींग महाविद्यालये) व महाराष्ट्र राज्यातील सरकारी, निमसरकारी अथवा प्रायव्हेट इंजिनिअरींग महाविद्यालयात प्रवेश मिळवता येतो. ह्या सर्वच ठिकाणी चढाओढ फारच जास्त असल्यामुळे १२वीचा अभ्यास सर्वच मुलं खूप मेहनत घेऊन करतात. शिवाय स्वतःच्या ऐपतीप्रमाणे पालक खाजगी शिकवण्या व शिकवणी वर्गांवरही बराच पैसा खर्च करतात. दुर्दैवाने बऱ्याच मुलांना त्यांच्या अपेक्षेपेक्षा खूपच कमी मार्क मिळतात. त्यामुळे त्यांची व त्यांच्या पालकांची स्वप्ने धुळीला मिळतात.

अलीकडच्या काळात नवीन नवीन सुरू झालेल्या खाजगी इंजिनिअरींग कॉलेजमुळे अभियांत्रिकी शिक्षणाचा चेहरामोहराच बदलून गेलेला आहे. आता इंजिनिअरींगला प्रवेश मिळणे फारसे कठीण राहिले नाही. कारण राज्यात एकूण १०० खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. ही सर्वच महाविद्यालये उत्तम प्रकारची आहेत, असे म्हणणे चूकच आहे. यापैकी फारच थोड्या खाजगी महाविद्यालयात उत्तम प्रकारचा शिक्षक वर्ग, चांगल्या प्रकारच्या उपकरणांनी सज्ज प्रयोगशाळा, उत्तम प्रकारची ग्रंथालये व इतर सुविधा आहेत. असल्या महाविद्यालयात प्रवेशासाठी फारच चढाओढ असते. तेथे प्रवेश न मिळाल्यास मग पालक हलक्या दर्जाच्या महाविद्यालयात नाईलाजाने प्रवेश घेतात. बरीच जास्त फी देऊनही उत्तम प्रकारचे ट्रेनिंग मिळत नाहीच. असल्या महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या इंजिनिअरींग पदवीधारांना नोकऱ्या देण्यास कारखाने तयार नसतात. त्यामुळे ह्या मुलांत वैफल्याची भावना निर्माण होते व तेथेही मग विद्यार्थ्यांना खाजगी शिकवणीवर्गाची मदत घ्यावी लागते. या सर्व प्रकारांतून स्वतः अभ्यास करणारे व स्वतःहून मेहनत घेऊन विषय समजून घेणारेच विद्यार्थी तग धरू शकतात व उत्तम प्रकारचे अभियांत्रिकी पदवीधर होऊ शकतात. असल्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळणे जड नसते. 'सक्षमाला जगण्याचा अधिकार असतो' हाच जगाचा न्याय झाला आहे व त्याला इलाज नाही.

या सर्वाला एक पर्याय आहे. तो पर्याय फक्त अभियांत्रिकी व्यवसायात प्रवेश करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे, हा पर्याय म्हणजे पदविका अभ्यासक्रम. बऱ्याच पालकांना हा मार्ग ठाऊक सुद्धा नसतो

व ते १२ वीच्या मृगजळामागे मुलांना धावायला लावतात. पदविका अभ्यासक्रम हा पूर्वीपासून प्रचलित आहे. पण अगोदरपासूनच त्याकडे बघण्याचा दृष्टीकोन हा थोडा कमी दर्जाचा कोर्स असाच होता. पण आता परिस्थितीत खूपच फरक झाला आहे. गेल्या दोन दशकापासून पदविका अभ्यासक्रमाचा दर्जा फारच वाढविण्यात आला आहे व तो दिवसेंदिवस अधिक चांगला करण्याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जात आहे. हा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने ठरविला असून तो बनविताना राज्यातील कारखान्यात कार्यरत असणाऱ्या इंजिनिअर्सची त्याबाबत सल्लामसलत घेण्यात आली आहे. त्यामुळे हा अभ्यासक्रम प्रात्यक्षिकांवर भर देणारा आहे. या मंडळाकडून परिक्षा नियोजित वेळेवरच घेण्यात येतात व निकालही अगदी वेळेवर लावण्यात येतात. निकालासाठी असलेल्या संगणकीय सोयी, विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिकांसाठी बनविलेली लॅब मॅन्युअलस्, विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम उत्तम प्रकारे समजावा ह्यासाठी बनविलेली मार्गदर्शन लर्निंग मटेरिअल्सची सुविधा देणारे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ हे देशातील एकमेव तंत्रशिक्षण प्रदान करणारे मंडळ आहे. या सर्व सुविधांमुळे पदविका अभ्यासक्रम जुनी कात टाकून एकदम उत्तम प्रकारचा अभ्यासक्रम म्हणून गणला जाऊ लागला आहे. पदविका अभ्यासक्रमावर मंडळातर्फे नियमित देखरेख ठेवली जात असते व त्याबाबतच्या सूचना वेळोवेळी देण्यात येत असतात. पदविका अभ्यासक्रमात मुख्यत्वे करून 'मुलभूत तत्वे' व 'प्रात्यक्षिक प्रशिक्षणांवर' जास्त भर दिला जातो. प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांची संख्या ६० च्या वर नसते, त्याचप्रमाणे लॅबमध्ये घेतल्या जाणाऱ्या प्रात्यक्षिकांत विद्यार्थ्यांची संख्या २०च्या वर जाऊ देत नाही. त्यामुळेच शिक्षक व विद्यार्थी ह्यांच्यात जास्त सुसंवाद साधला जातो. प्रत्येक विषयाचे मुलभूत तत्व पूर्णपणे समजावून देण्यासाठी सोयिस्कर पद्धती व प्रात्यक्षिके अवलंबली जातात व त्यामुळे मुलभूत तत्वे पूर्णपणे समजावून देण्यासाठी सोयिस्कर पद्धती व प्रात्यक्षिके अवलंबली जातात व त्यामुळे मुलांना त्याचा फायदा होतो. पदविका अभ्यासक्रम हा ३ वर्षांचा असून तीनही वर्ष हीच पद्धत अवलंबली जाते. ह्या तीन वर्षांच्या अथक परिश्रमाने विद्यार्थी हा सक्षम तर होतोच पण त्याला स्वत: काम करण्याची सवय लागल्याने तो कुणावरही अवलंबून रहात नाही. पदवीधराच्या बाबतीत याची खात्री देता येत नाही. पदविका अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या परीक्षेत विद्यार्थ्याला ६०% अथवा जास्त मार्क मिळाले तर हा विद्यार्थी अभियांत्रिकी महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळण्यास पात्र ठरतो. दुर्दैवाने त्याला ६०% पेक्षा कमी मार्कस मिळाले तरी सध्या प्रचलित असणाऱ्या राज्य साकारच्या नियमानुसार हा विद्यार्थी पदवीच्या प्रथम वर्षास प्रवेश मिळविण्यास पात्र ठरतो. अर्थात ह्यासाठी त्या महाविद्यालयात प्रथम वर्षात जागा रिकामी असणे गरजेचे असते. पण द्वितीय वर्ष प्रवेशासाठी हा नियम नाही. तेथे पदविका अभ्यासक्रमातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना कोर्स क्षमतेच्या १० टक्के जागा राखून ठेवलेल्या असतात. त्यामुळे प्रवेश मिळणे अवघड होत नाही. बऱ्याच तंत्रनिकेतनांचा कारखान्यांशी उत्तम संपर्क असतो. त्यामुळे पदवी शिक्षण घेण्यास उत्सुक नसलेला विद्यार्थी कारखान्यात नोकरी मिळवू शकतो. प्रात्यक्षिकांचे कौशल्य व मूलभूत तत्वांचा जुजबी अभ्यासणाऱ्या या पदविका विद्यार्थ्याला नोकरी देण्यास बऱ्याच कंपन्या प्राधान्य देतात. या मुलांना टेक्निशिअन व सुपरव्हायझर या पदावर नियुक्ती दिली जाते.

बरेचसे विद्यार्थी टेक्निकलला मार्केटिंग मध्ये सुद्धा घेतले जातात. राज्यातील काही अभियांत्रिकी महाविद्यालयात अर्धवेळ पदवी शिक्षण सुद्धा दिले जाते. पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून पदवीच्या द्वितीय वर्षात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांना बऱ्याचशा अभियांत्रिकी विषयांचे प्राथमिक ज्ञान त्याच्या पदविका अभ्यासक्रमात मिळालेलेच असते. त्यामुळे त्या विषयाचा सखोल

अभ्यास करणे त्याला अवघड जात नाही. पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क सरकारी तंत्रनिकेतनात ६,०००/- तर खाजगी तंत्रनिकेतनात २०,००० ते २५,०००/- या दरम्यान असते. या व्यतिरिक्त त्याला कुठलाच खर्च येत नाही. कारण प्रत्येक तंत्रनिकेतनात त्याला लागणारी सर्व मटेरिअल्स असतात. त्याला स्वत: अभ्यास करण्याची सवय लागते. असला विद्यार्थी पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून थोडी कमी सुविधा असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात गेला तरी त्याला ३ वर्षात लागलेल्या सतत अभ्यास करण्याच्या पद्धतीमुळे टिकून राहू शकतो. दहावीनंतर पदविका अभ्यासक्रमाची ३ वर्षे व पदवी अभ्यासक्रमाची ३ वर्षे यामुळे त्याच्या वर्षाचे नुकसान सुद्धा होत नाही. शिवाय अभियांत्रिकी विषयाचा तो ६ वर्षे अभ्यास करत असतो व त्यामुळे तो त्यास जास्त पारंगत होतो. तंत्रनिकेतनाच्या तृतीय वर्षात त्याला 'प्रॉजेक्ट' तयार करावे लागते. तीन वर्षे शिकलेल्या विषयांचे एखाद्या 'प्रॉजेक्ट'मध्ये रुपांतर करता आल्याने त्याचा आत्मविश्वास खूपच वाढतो. प्रॉजेक्ट हा तीन अथवा चार विद्यार्थ्यांनी मिळून करावयाचा असल्याने सांघिक पद्धतीने काम करण्याची वृत्ती निर्माण होते. शिवाय विषयाच्या सखोल ज्ञानाचा उपयोग करून नवनिर्मितीचा आनंद घेता येऊ शकतो. यातूनच एखादा विद्यार्थी उत्पादक बनू शकतो. थोडक्यात दहावीत बऱ्यापैकी मार्कस् मिळवून १२ वी च्या मागे न धावता ३ वर्षे पदविका अभ्यासक्रम व्यवस्थित केल्यास पुढची बरीच दालने उघडी होऊ शकतात.

सबब विद्यार्थी आणि पालकांनी या मार्गाचा विचार करण्यास हरकत नसावी. खूप बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांनी १२ वीत प्रवेश घेऊन अगोदर सांगितल्यापैकी कोणताही मार्ग स्वीकारावा.

साधारणपणे १०वीत गणित व विज्ञान ह्या दोन विषयांत ९० टक्क्यांपेक्षा जास्त मार्कस् असणाऱ्या विद्यार्थ्यांना १२वीला जाण्यास हरकत नाही. ६० ते ९० टक्के मार्कस् असणाऱ्या विद्यार्थ्यांना पदविका + पदवी हा मार्ग अधिक सुखकर होऊ शकतो. पदविका अभ्यासक्रमाचा चांगला अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला चांगल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात सहज प्रवेश मिळू शकतो. या प्रकारची उदाहरणे गेली १७ वर्षे आम्ही आमच्या तंत्रनिकेतनात बघितली आहेत. त्यामुळे हे बोल अनुभवाचे आहेत. विद्या प्रसारक मंडळाच्या तर्फे चालविण्यात येणारे तंत्रनिकेतन हे वर सांगितलेल्या सर्व सोयींनी परिपूर्ण आहे. उच्चशिक्षित व कार्यक्षम शिक्षकवर्ग, उत्तम प्रकारच्या उपकरणांनी युक्त अशा लॅब्ज, उत्कृष्ट पुस्तकांचा संच, देशी व आणि विदेशी नियतकालिके असलेले ग्रंथालय, संगणकांची सोय, इंटरनेटची उपलब्धता व प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणारी ही मुंबई परिसरातील एक अग्रगण्य संस्था आहे. अशा संस्थेत प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला नाही तरच नवल. स्वप्ने बघण्यास काहीच हरकत नाही. पण जी स्वप्ने सत्यात उतरविता येतील तीच स्वप्ने अथक प्रयत्न करून सत्यात आणणेच श्रेयस्कर ठरेल.

**प्राचार्य सी. श्री. मुजुमदार**
वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन,
'ज्ञानद्वीप', ठाणे - ४०० ६०१.

**दिशा**
नियमित वाचा
*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

# मॉर्निंग वॉक

एकदा माझ्या मुलीची ट्रीप महाबळेश्वरला जाणार होती. पहाटे पाच वाजताच मी त्यांच्या ठरलेल्या जागी सोडायला गेले. येताना पटकन रिक्षा मिळेना म्हणून आपली दोन पायांची रिक्षा चालू केली. रस्त्यावर वर्दळ तशी कमीच होती. काही घरे झोपाळलेली होती तर काही घरातून गडबड ऐकू येत होती. कुठेतरी रेडीओचे स्वर कानी येत होते. कुठेतरी लवकर जाणाऱ्या चाकरमान्यांची कुकरची शिट्टी. पेपरवाले आपले काम शक्य तेवढे वेगात करत होते. दूधवाले सायकलवरुन जा-ये करत होते. झाडूवाले रस्ता साफ करत होते. कोणी गाडी पकडायला धावत होते. तर कोणी दूरच्या प्रवासाला जाणारे रिक्षा शोधत होते. चहाची दुकाने तत्परतेने उघडली होती. वाफाळलेल्या चहाचे घुटके घेत माणसे ताजीतवानी होत होती. उंच इमारतीत एखादे जुन्या पद्धतीचे घर लपले होते. त्यात सडामार्जन झाले होते व प्रभात गीत ऐकू येत होते.

वाटेत मैदान लागले. काहीजण पळण्याचा व्यायाम करत होते तर काहीजण जलद चालण्याचा. पायात कॅनव्हॉसचे बूट, व्यायामाचे कपडे. काहीजण हातात रॅकेट नाचवत चालले होते. रोजच्याच वेषात आजी-आजोबाही एकमेकांना सांभाळत होते. चालून आल्यावर काही माणसे गटागटाने कठड्यांवर बसलेली होती. मैदानावरील दृश्य पाहून माझी मलाच लाज वाटली. आपणच कसे 'सूर्यवंशी'. घड्याळाच्या काट्याप्रमाणे धावणारे आपण आणि रिक्षा, ट्रेन, बस, टॅक्सी यावर आधारित राहून बसून काम करणे. घरात वेळ वाचवायला आधुनिक उपकरणे सज्ज असतात. यात हा व्यायाम किती आवश्यक आहे. दिवसभर वाहने नुसती धूर ओकत असतात तेव्हा गावापासून दूर मोकळ्या हवेत फिरणे किती आवश्यक आहे, याची जाणीव मला होत होती.

तेथून पुढे गेल्यावर देवळात काकड आरती चालली होती. संपूर्ण मांगल्य वातावरणात भरत होती. लोक बाहेर जातानाही देवळाकडे आपोआप वळत होते. या सर्व घटनांना आपण मुकतो याची चुटपुट लागत होती. एकीकडे चालत आल्याने दृष्टीस पडलेल्या सर्व घटना किती आनंददायी होत्या, याचा विचार करत होते. 'लवकर नीजे लवकर उठे ।' असे का म्हणायचे हे समजत होते. आजच्या काळानुसार आपली जीवन पद्धतीच बदलली आहे. पूर्वी लोक मैलोनमैल चालायचे. आता थोडेसे दूर जायचे तर आपण रिक्षाला हात करतो. थोडे आधी निघून चालत जाऊ, असा विचार आपल्याला शिवतही नाही.

माझ्याच ओळखीची स्त्री आहे. मुलगी मोठी आहे. घरात नवरा-बायको, मुलगी फक्त तिघेजणच असतात. त्या बाईची नोकरी ठाण्यातच आहे. २० ते २५ मिनीटे चालले तरी पोहोचू शकते. आम्ही एकदा कामानिमित्त त्यांच्या घरी जाणार होतो. तेव्हा तिने स्पष्ट सांगितले. संध्याकाळी आम्ही 'वॉक'ला जातो.

चालण्यासारखा व्यायाम अतिशय उत्तम आहे. पण त्यात नियमितता असायला हवी. आजच्या आपल्या सुखसोयींनी युक्त अशा शहरात काय शक्य नाही. आज आपल्याला निसर्गाचे महत्त्व समजत आहे. गाजर, कार्ले, कडुनिंब, गव्हाचे रोप, आवळा अशा अनेक गोष्टींचा रस विकायला एक माणूस तत्पर असतो. आजच्या वेगवान जीवनात गाजर, मुळा असे रस काढत बसायला वेळ नसतो.



त्यापेक्षा ५/१० रुपये दिले की रोज रस हातात तयार मिळतो.

या पहाटेच्या भ्रमंतीची गोष्टच न्यारी असते आणि ती बाहेर पडल्याशिवाय कशी अनुभवता येणार. पहाटे आपण निसर्गाच्या जवळ राहून विचार केला तर झाडावर उमललेली फुले दिसतात. पक्षांचे किलबिलणे ऐकू येते. म्हणजे सूर्यदेवतेच्या स्वागतासाठी निसर्ग सज्ज असतो. तो आपल्याला हेच शिकवत असतात, आळस झटका आणि उठा.

असा विचार करत मी उगीचच लांब फेरफटका मारला होता आणि शरीरात चैतन्य आल्यासारखे वाटत होते. उत्साही माणसांकडे पाहून आपलाच उत्साह वाढतोय असे वाटत होते, असा विचार करत सोसायटीच्या गेटमध्ये शिरले आणि 'घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' स्वर कानावर आले. आता सर्व घरे प्रसन्न वाटत होती. मी माझ्या घरात शिरले ती रोज पहाटेच्या भ्रमंतीचा निश्चय करूनच!

सौ. वंदना सं. प्रसादे
ठाणे (प.)
दूरध्वनी : ५४००६५२

लेख / वर्गणी / जाहिराती पाठविण्यासाठी पत्ता

संपादक, दिशा
विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.
दूरध्वनी : २५४२ ६२७०

(पान नं. ७ वरून पुढे)

## जगन्नाथ पंडित

लोकांचा भार टाकलेला आहे, असा हा जगन्नाथ तुझ्या कृपेमुळे सुखाने झोपत असतो.

**दशहरा उत्सव -**

ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा ते दशमी अखेर गंगेचा उत्सव होतो. त्या प्रसंगी गंगा स्तवनांची पारायणे करण्याचे जगन्नाथाने ठरविले. दशहरात स्नान, पान व ध्यान, ही प्रमुख अंगे आहेत, असे याचे आचरण केले असता दशविध दोष नाहीसे होतात. ते येणेप्रमाणे कायिक तीन, मानसिक तीन, वचिक चार, एकूण दहा दोष -

कायिक - दिल्यावाचून वस्तू घेणे (चोरी)
शस्त्रा वाचून हिंसा करणे (अहिंसा पालन)
परस्त्री गमन

वाचिक - कठोर बोलणे, खोटे बोलणे, चहाडी करणे, असंबद्ध बोलणे

मानसिक - परद्रव्य हरण करणे, दुसऱ्याचे वाईट चिंतणे, एखाद्या वस्तूविषी उगाच आग्रह धरणे.

ज्येष्ठ शुद्ध दशमीला दहा योग जमल्यास उत्तम मानले जाते. ज्येष्ठ मास, शुक्ल पक्ष, दशमी तिथी, बुधवार, हस्त नक्षत्र, व्यतिपात, गरज करण, आनंद योग, कन्याराशीत चंद्र व वृषभेचा सूर्य. या योगावर गंगेचे स्तवन फलदायी होते, असे मानले गेले आहे. सांप्रतही दशहरात गंगा उत्सव साजरा केला जातो. (बुधवार व हस्तनक्षत्र याला आनंद योग म्हणतात.)

या दशहरात गंगेचे स्तवन करून जगन्नाथ पंडित अजरामर झाले.

शं. वा. मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

# स्वामी विवेकानंद

*कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेतील कनिष्ठ महाविद्यालयातील एका विद्यार्थ्याचे हे भाषण आहे.*

\- संपादक

'अमेरिकेतील माझ्या बंधूनो आणि भगिनींनो' या शब्दातील आपुलकी, तेजस्विता व प्रेममयता मोठमोठ्या विद्वानांच्या मनाला स्पर्शून गेली. खरच ! स्वामी विवेकानंद नुसतं नाव उच्चारलं तर डोक्यावर भगवा फेटा, तेजस्वी टपोरे डोळे, प्रसन्न हास्य, भगवी कफनी, डौलदार बांधा अशी तेजःपुंज मूर्ती डोळ्यापुढे उभी राहते.

जवाहरलाल नेहरू म्हणाले, 'भगधगीत चैतन्य व मूर्तिमंत उत्साहाचे स्वामी विवेकानंद प्रतीक होते आणि हाच आदर्श तरुणांस उपयुक्त आहे.

तरुण हा सळसळत्या रक्ताचा आणि उसळत्या उत्साहाचा असतो. पण आजच्या तरुणाचे हे रक्त बेकारी, भ्रष्टाचार यामुळे सांडते आहे. म्हणूनच आज स्वामी विवेकानंदाच्या चैतन्याचा, उत्साहाचा आदर्श भारतीय तरुणांनी समोर ठेवण्याची वेळ आली आहे. स्वामीजी हे शक्तीचे उपासक होते. संघर्ष त्यांच्या नसानसात् भरला होता. त्यांनी देशबांधवांच्या उद्धारासाठी वेदान्ताची व्यवहारिक पातळीवर मांडणी केली होती. पूर्व व पश्चिम, धर्म व विज्ञान, भूत आणि वर्तमान यांचा संगम घडवून आणला. या स्वामीजींच्या जीवनाची व कार्याची महती आळवण्याची वेळ आता आली आहे.

आज भारतात दुःख, दैन्य, दारिद्र्य, अज्ञान, बेकारी, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा, निरक्षरता (धर्मभेद, जाती), विध्वंसकता अशा कितीतरी समस्या आहेत तसेच विध्वंसकता, नैराश्य, मनाचा दुबळेपणा, स्वार्थपरता, सुखासीनता, कामुकता, स्पर्धात्मकता, माणुसकी शून्यता अशा कितीतरी समस्या तरुणांपुढे आहेत.

या सर्व समस्यांना एकच उत्तर म्हणजे स्वामीजींच्या विचारांचे, आचारांचे, व्यक्तिमत्त्वाचे चारित्र्य अभ्यासले तरी आजच्या युवकाला योग्य दिशा मिळेल व स्वामीजींचे समृद्ध व बलिष्ठ भारताचे स्वप्न साकार होईल.

स्वामी विवेकानंद म्हणतात, 'माझी भिस्त आहे युवापिढीवर, तेच निधड्या छातीने पुढे येऊन सारे प्रश्न सोडवतील. स्वामीजींना माणसे हवी आहेत. ते म्हणतात प्रथम आत्मश्रद्धा दृढ करा. प्रत्येक व्यक्तीमात्रांचे ठिकाणी तीव्र चिरंतन शक्ती वास करत असते. उठा, आपला विचार देशादेशात भिनवा. बलदंड, सशक्त, निष्ठावंत, प्रामाणिक, तीक्ष्ण बुद्धीचे लोकच ईश्वराप्रत पोहोचतात, असे स्वामीजी सांगतात.

खरेच आजच्या तरुणाचा स्वतःवरचा विश्वास उडालेला दिसतो. एकीकडे तो बुद्धिमान आहे, चोकस आहे, धडपड्या आहे. पण बऱ्याचदा अभ्यास, खेळ, कला सर्वच बाबतीत विकृत स्पर्धा व भ्रष्टाचार दिसून येतो. मन निराश होते, गोंधळते. मग ही दुबळी मने खोटे बोलणे, चोरी करणे, कधी गंमत म्हणून सिगारेटचा झुरका, मद्याचा घोट घेतात व याच सवयीतून व्यसनी होतात. कधी गरीबी, चिंता यामुळे तरुण व्यसनाच्या आहारी जातात. याउलट फार पैसा हाती आला तरी चरस, गांजा यासारखी अंमली पदार्थांच्या आहारी जातात.

तरुण हा बुद्धिमान असून कमकुवत होतो व त्यामुळे त्याच्यात आत्मनिर्भरतेचा अभाव तरुणात दिसून येतो. तेव्हा अशा युवकांना स्वामीजी म्हणतात, 'बंधूनो जागे व्हा, तुम्ही मेंढरे नाहीत, सिंह आहात.' तरुणाने मनाने व शरीराने खंबीर व्हायला हवे.

Sound mind in Sound body म्हणजेच स्वस्थ मन हे सुदृढ, स्वस्थ व बळकट शरीरातच असते. शांत शरीरातच शांत मन वास करते. यासाठी व्यायाम करा.

शरीर बळकट करा, त्यातूनच तुमची प्रतिकार शक्ती वाढणार आहे.

आपण देशाचा व धर्माचा अभिमान बाळगायला हवा. आमच्या धर्माने उदार मनाने जगाला सहिष्णुता शिकवली याचा आपणास आनंद आहे.

आज जातीभेद, धर्मभेद इ. मुळे भांडण-तंटे होतात. क्षुल्लक कारणांवरून विध्वंस केला जातो आपण एक दुसऱ्याच्या जीवावर उठतो. हे टाळण्यासाठी आपण एकसंघ व्हायला हवे. 'माणूस' बनायला हवं. व्यक्तीगत सुखाच्या आकांक्षाचा त्याग करायला हवा. भारतातील हे दारिद्र्य, दुःख पाहून स्वामी विवेकानंदाना वाईट वाटते, म्हणून ते म्हणतात गरीब, अज्ञानी, अशिक्षित जनता अगदी सुतार, चांभार इ. साऱ्यांचीच समाजाला गरज आहे. आपण भारतीय आहोत म्हणून अभिमान बाळगायला हवा, मातृभूमी हे दैवत मानावे. मातृभूमीच्या सेवेत आम्ही आपले आयुष्य घालवू अशा शपथा स्वामीजींच्या व्याख्यानाने भारावून बंगालमधील तरुणांनी घेतल्या, तशा शपथा आज घ्यायला हव्यात पण फक्त शपथा घेऊन चालायचे नाही तर त्या आचरणात आणायला हव्यात. तत्वांवर श्रद्धा ठेवून जीवन अर्पण करायला हवे. मनुष्यजातीच्या हितासाठी तुमच्या हृदयाची दारे उघडे करा. दुःखी, दीन, आजारी, अनाथ यांच्यात ईश्वर पहा कारण जनसेवा हीच ईश्वरसेवा.

आज 'मी'ला फार किंमत दिली जाते. तरुण स्वतःपुरता विचार करतो. त्याच्या विश्वात आई-वडील, भाऊ-बहिण यांनाही स्थान नसते. माझे सर्वांनी ऐकले पाहिजे. मी माझ्यापुरता पाहीन ही वृत्ती झाली आहे. याच्या विरुद्ध दुसऱ्यांची दुःखे सोडवण्यासाठी स्वामीजी हजार वेळा जन्म घेण्यास तयार आहेत. एवढे स्वामीजींचे मन कोमल होते. पण नियमांचे पालन करताना ते वज्रासारखे कठोर देखील होते.

मौजमजा करणे एवढेच जीवन नाही. मनाच्या शांततेची, एकाग्रतेची आजच्या तरुणाला गरज आहे. त्याचे मन चंचल आहे, ते स्थिर नाही. आजचा तरुण जीवनात प्रयत्नाशिवाय सुख, चैन उपभोगू इच्छितो. चित्रपटातून वासना चाळवणारी दृश्ये पाहून तरुणांचे मन बहकते. प्रेमातील निराशेमुळे तरुणीवर ॲसिडफेक, वासनेच्या भावनेतून घडणाऱ्या बलात्काराच्या गोष्टी आपणास वृत्तपत्रात वारंवार वाचायला मिळतात. यातून स्वप्नरंजनात दंग असलेला, आत्मविश्वासरहित, चारित्र्याचा ऱ्हास झालेला तरुण पाहायला मिळतो.

या पार्श्वभूमीवर स्वामीजी म्हणतात, योग्य आणि अयोग्य यातील फरक ओळखा. आळस सोडून द्या. उद्योगाची कास धरा. जीवन तेजस्वी करा. जन्मास आलात, एखादे चिन्ह ठेवून जा आपल्या घामाच्या व रक्ताच्या थेंबागणिक अनेक कर्मवीर निर्माण होतील.

आम्हांला आजूबाजूला आदर्श कुणी नाहीत. सगळीकडे रक्तपिपासू, भ्रष्टाचारी, ढोंगी माणसेच आहेत. आदर्श नेतृत्व नाही, असा ओरडा तरुण करताना दिसतो. अशांनी स्वामीजींचा आदर्श आपल्या स्वतःपुढे ठेवावा.

स्वामीजी सांगतात, तरुणांनो एक उच्च उद्देश ठेवून जीवन जगा. बोलण्यापेक्षा कामाला अधिक महत्त्व द्या. जीवन एक लढाई आहे. लढता-लढताच मरण येऊ द्या. आपल्या हातातून चांगले काम होण्याची तळमळ ठेवा. वाऱ्यासारखे स्वातंत्र्य, वेलीसारखे नम्र आणि कुत्र्यासारखे आज्ञाधारक व्हा ! स्वामीजींना तरुण हवे होते. ते चारित्र्यवान, सुदृढ, निष्ठावंत अशी शंभर माणसे मिळाली तर साऱ्या जगात क्रांती होईल. जगात माणुसकी उत्पन्न होईल. खरेच ! भारताच्या महान पुत्राचा व महान संदेश आजच्या युवकाने मनावर कोरायला हवा. मनात रुजवायला हवा तेव्हाच तरुणाचे तारुण्य बहरेल.

युवाशक्ती ही समाजाची विधायक शक्ती आहे, फक्त तिने संघटित व्हायला हवे तरच पुन्हा एकदा समृद्ध व बलिष्ठ भारत घडू शकेल यात शंका नाही.

**नितिन अरुण धुरी**
के.जे.सोमैय्या महाविद्यालय,
(कला व वाणिज्य)

•••

# सावधान ! कारखाने बंद पडत आहेत.

*कारखाने बंद पडत आहेत, या वास्तवाचा संधी म्हणून स्वीकार करावा, असे सुचविणारे हे विचार. के. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेतील वरिष्ठ गटातील विद्यार्थ्यांचे हे भाषण. - संपादक*

'वसुधैव कुटुंबकम्', 'ग्लोबल व्हिलेज'चे नारे देत आज आपण इच्छेने म्हणा वा अनिच्छेने जागतिकीकरणाला सामोरे चाललोय. आता कुटुंब असो वा गाव 'बळी तो कान पिळी' हा सनातन निसर्गनियम सर्वत्रच लागू होतो. त्याचप्रमाणे आपल्याला दिसतय की आज बड्या कंपन्या छोट्या कंपन्यांना पायदळी तुडवत स्वत: गरुड भराऱ्या मारत आहेत. संपूर्ण जगातच इतकी जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे की जो तो आपले अस्तित्व टिकवण्याकरता धडपडतोय, संघर्ष करतोय, जो या स्पर्धेत स्वत:ला टिकवून ठेऊ शकत नाही तो मागे फेकला जातोय.

भारताच्या मध्यमवर्गीय बाजारपेठेत सुमारे २५ कोटी ग्राहक आहेत. संपूर्ण युरोपची लोकसंख्याही याहून कमी भरेल तर इतक्या मोठ्या बाजारपेठेकडे परराष्ट्रीय कंपन्या आकृष्ट न होत्या तर नवलच ! चीन हा आंतरराष्ट्रीय करारांपासून फटकून वागत असल्याने नवे आर्थिक युद्ध हे भारताच्याच रणभूमीवर खेळले जाणार व आज आपण या- युद्धाची नांदी पाहतोय. भारताने गॅट कराराद्वारे परराष्ट्रांना आपली द्वारे खुली करून दिली आणि अक्षरक्ष: गिधाडासारख्या या परराष्ट्रीय कंपन्या भारतीय बाजारपेठेवर तुटून पडल्या. परिणाम व्हायचा तोच झाला. भारतीय कारखाने, भारतीय उद्योग यासमोर या विदेशी कंपन्यांना तोंड देण्याचे आव्हान उभे ठाकले. ज्यांना हे आव्हान पेलवले ते तरले पण बरेच जण या आव्हानाचा मुकाबला करू शकले नाहीत. भारतीय कारखाने बंद पडले, उद्योग थंडावले आणि खरंतर तेव्हाच मध्यमवर्गीय चाकरमानी माणसाच्या मनात बेकारीची कुऱ्हाड कोसळल्याची भीती घर करून राहू लागली.

११ सप्टेंबरच्या हल्ल्याने सगळ्या जगावरच मंदीचे ढग जमले. सुस्थापित विदेशी कंपन्यांना ही आपले वर्चस्व कायम ठेवणे अवघड वाटत आहे, त्यामुळे कामगार कपातीसारखे मार्ग त्या अवलंबत आहेत. अनेक नामांकित कंपन्यांनाही आपल्या काही शाखा बंद कराव्या लागत असल्याचे आपण पाहतोय. सरकारनेही नोकर कपातीचे धोरण स्वीकारले आहे. तोटच्यातील उद्योगांचे खाजगीकरण चालवले आहे व सामान्य जनतेने कितीही विरोध केला तरी खाजगीकरण हे होऊनच राहणार. आपल्याला स्पर्धेला सामोरं जावच लागणार व म्हणूनच आपण सकारात्मक दृष्टीने खाजगीकरणाकडे पाहिले पाहिजे.

कारखान्यांनी नोकरकपातीचे, कारखाने बंद करण्याचे पाऊल अपरिहार्यपणे उचलले आहे. त्यामुळे बंद पडणाऱ्या कारखान्यांना कोणी रोखू शकत नाही. पण प्रश्न आहे तो बेरोजगार झालेल्या कामगारांचा व बेरोजगारीची टांगती तलवार डोक्यावर घेऊन वावरणाऱ्या कामगारांचा. कारण कारखाने तर अजूनही बंद पडताहेतच. आता खरच गरज भासतेय, काही वेगळ्या वाटा शोधण्याची अथवा काही जुनच पुन्हा नव्याने सुरू करण्याची. कारखान्यांना कामगार कपात करणं अथवा शाखा बंद करणं भागच आहे. त्यामुळे बेरोजगार कामगारांनी व तरुणांनी आता चाकरमानी वृत्ती सोडून काही वेगळं करू धजलं पाहिजे.

भारताचा आजही शेती हा प्रमुख व्यवसाय आहे व शेतीकरता शासन अनेक योजनाही राबवत असते. बेरोजगार कामगारांसाठी शेती हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. योग्य तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतातून भरघोस नफा कमावणं शक्य आहे. तसेच भारतात शेतमालाची साठवणूक व त्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचाही म्हणावा तसा विकास झालेला नाही. योग्य मार्गदर्शनाखाली याही क्षेत्रात नफ्याला वाव आहे. भारतात साधारणत: गावातून शहराकडे नोकरीनिमित्त जाण्याची वृत्ती दिसून येते. या आपल्या मानसिकतेत आपण जाणिवपूर्वक बदल घडवला पाहिजे. गावातील आपली स्वत:ची जमीन सोडून शहरात १० × १० च्या खोलीत पिंपातील उंदराचं आयुष्य जगण्यापेक्षा गावातच मानाने आपली जमीन कसणं हे केव्हाही श्रेष्ठच नाही काय?

आपल्याकडे कामगारांमध्ये या संदर्भातही अनेक भीतीयुक्त गैरसमज असलेले दिसून येतात याला कारण देखील आपली मानसिकताच आहे. स्वेच्छानिवृत्तीचे पैसे कामगारांनी व्यवसायात गुंतवायला हवेत. व्यवसायात गुंतवल्याने पुन्हा नव्या रोजगार निर्मितीसही चालना मिळेल. या परिस्थितीस आपत्ती न समजता नव्या क्षेत्रात जाण्याची संधी समजायला हवं. पण आपल्याकडे मध्यमवर्गांची मानसिकताच इतकी संकुचित झाली आहे की तरुणपणी एकदा का एखाद्या कारखान्यात भरती झाली की थेट वयाच्या ५६-५८व्या वर्षीच बाहेर पडायचं या चाकोरीबद्ध जीवनातच आपण आनंद मानू लागलोय. काही वेगळं करण्याची, काही धाडस स्वीकारण्याची वृत्तीच मध्यमवर्गात उरली नाही.

अमेरिकेच्या प्रगतीचं सर्वात प्रमुख कारण म्हणजे तेथल्या लोकांची धाडसाला सामोरं जाण्याची वृत्ती. अन्यथा अमेरिकेचा इतका विकास शक्यच झाला नसता आणि म्हणूनच हेन्री फार्ड सारखा सामान्य शेतकऱ्याचा मुलगा स्वत:ची बलाढ्य 'फोर्ड' कंपनी उभारू शकला. तेथील सामान्य माणूसही स्वत:ची आंतरराष्ट्रीय कंपनी स्थापन करण्याची स्वप्न बघतो. ज्या कंपनीचा व्यापार उण्या पुऱ्या १०-१२ कंपन्यांसोबत चालायचा त्या थॉमस वॉटसनच्या कंपनीचे नाव त्याने ठेवले होते 'इंटरनॅशनल बिजनेस मशीन' आज 'I.B.M.' ही जगातील एक अग्रगण्य कंपनी आहे. ही मानसिकता जोपासायला हवी. कारखाने बंद पडत आहेत. नोकरीच्या संधी कमी होत आहेत, अशी ओरड माजवून हातावर हात ठेऊन बसण्याने काहीच साध्य होणार नाही. त्याबद्दल चिंता वाहण्यात काहीच अर्थ नसतो. मात्र जे आपण करू शकतो ते करण्यास उशीर का लागावा.

आज भारतीय तरुणांनी स्वयंरोजगाराकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. हुशार विद्यार्थ्यांना, तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्रात भरपूर वाव आहे. विज्ञानाने आज अनेक क्षेत्रे उघडी करून दिली आहेत पण सामान्य बुद्धीच्या तरुणांनी देखील त्यांच्या क्षमतांना न्याय देणारे, किमान कौशल्यावर आधारित असे प्लंबींग, इलेक्ट्रीशयन, मेकॅनीक, सुतारकाम असे व्यवसाय निवडायला हवेत. आज तर या बदलत्या जगात अनेक नव्या रोजगार संधीही उदयास आल्या आहेत. डोळसपणे बाजारावर लक्ष ठेऊन आपला नफा साधण्याची वृत्ती बाळगणाऱ्याला बरच काही करण्याजोगं आहे.

आज संगणकाच्या वापरासोबतच संगणकाचा कचराही वाढतोय. संगणकाच्या 'मदरबोर्ड'मधील सोने रासायनिक प्रक्रियेने वेगळे काढण्याचा व्यवसाय होऊ शकतो. पुन: वापर करता येण्यासारखा प्लास्टीकचा व्यवसाय होऊ शकतो, काचेचा पुन: वापर करणारा व्यवसाय शक्य आहे. महाराष्ट्रात आधी जनावरे मेल्यावर त्यांची कातडी कमावून त्यांची विल्हेवाट लावीत. कातडी कमावण्याच्या कामावर असलेले एकाच जातीचे प्राबल्य

पाहून डॉ. आंबेडकरांनी त्यांना हे काम न करण्याबद्दल आवाहन केले. तेव्हापासून महाराष्ट्रात कित्येक करोड रुपयांची कातडी वाया जात आहे. ती कमावण्याचा व्यवसाय होऊ शकतो. याशिवाय दुर्मिळ वनौषधींची शेती, विदेशी भाज्यांची लागवड, आता चर्चिला जात असलेला पर्यटन व्यवसाय अशा अपारंपरिक व्यवसायाकडे आज बेरोजगार लोकांनी वळण्याची आवश्यकता आहे. याकरिता तरुणांनी रुढीबद्ध चाकरमानी वृत्ती सोडून नवी व्यावसायिक दृष्टी बाळगली पाहिजे.

पण आपल्याकडे चाकरमानी वृत्ती इतकी खोलवर रुजली आहे की स्वतंत्र व्यवसाय करण्याचा आपण विचारही करत नाही. नोकरीची सुरक्षितताच आपल्याला अधिक भावते. त्यामुळे आजही अशी चाकरी करण्याकडेच आपला कल असतो. स्वत:चा छोटा व्यवसाय करण्याला आपण दुय्यम मानतो. समाजात 'श्रमप्रतिष्ठा' भिनली नसल्याचेच हे लक्षण आहे. कुठलेही काम हे नेहमीच श्रेष्ठ असते. कष्टाने कमवलेल्या पैशातून भाकरीची चतकोर जरी मिळाली तरी ती मानाने खाऊ शकतो. पण आपण स्वयंरोजगारातील श्रमाचे महत्त्व जाणूनच घेऊ इच्छित नाही. चाकोरीबद्ध संकुचित जीवनच आपल्याला अधिक प्रिय आहे.

इंग्रजांच्या आगमनानंतर भारतात कारकुनी वर्ग उदयास आला. भारतात औद्योगिक क्रांतीचे वारे पोहोचल्यावर कामगार वर्गाचा उदय झाला. आज भारत पुन्हा एका मोठ्या बदलाच्या उंबरठ्यावर उभा आहे व हा बदल आपल्याच पिढीपासून लागू होणार आहे. तेव्हा आपण आधीच याकरिता तयार राहणं योग्य ठरेल. कारण जग अफाट वेगाने पुढे चाललंय ही गती जीवघेणी आहे खरी पण आपल्याला आपलं अस्तित्व या जगात कायम ठेवायचं असेल तर आपण जगाच्या गतीबरोबर पळायलाच हवं, काळासोबत आपणही बदलायलाच हवं. आज मागे पडणाऱ्या कडे वळून पाहण्यासही कुणाला वेळ नसतो तर त्याची चिंता वाहण्याची तर गोष्टच सोडा. या बदलत्या प्रवाहाशी आपण लवकरच एकरुप नाही होऊ शकलो तर जगाच्या दृष्टीने आपण 'मागास' ठरू.

म्हणूनच म्हणतो, आज वेळ आली आहे, आपल्या मनगटातील पोलादीपण जगाला दाखवून देण्याची, स्वत:ला नव्याने सिद्ध करण्याची. आज काळ बिकट आहे खरा. पण वेळ आली आहे धुरंधरपणे काळाला जाऊन भिडण्याची, काळावर मात करण्याची. आज वेळ आली आहे, महासत्तेच्या दिशेने पहिलं पाऊल उचलण्याची.

**सुयोग सुर्वे**
एफ.वाय.बी.ए.
सी.एच.एम. कॉलेज, उल्हासनगर



# श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय १५ वा) ।। पुरुषोत्तमयोगः ।।

(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्‌भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी)

श्रीमती भिडे यांचा गीतेवरील लेखमालेतील हा १५ व्या अध्यायावरील लेख. - संपादक

''उर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम ।
छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥''

सर्वांना परिचीत व मुखोद्‌गत असलेला असा हा अध्याय १५वा. लहानपणीच काहीही न समजता पाठ केलेला, त्या वयात धडाधडा पाठ म्हणून पाठांतर स्पर्धेत बक्षिसे मिळवलेला असा हा अध्याय आजही आम्हाला मुखोगत आहे. आम्ही तो आमच्या मुलानातवंडानाही तोंड पाठ करायला लावलाय. (काही न समजता न समजून घेता) देवाचे स्तोत्र म्हणायचे म्हणून आम्ही तो आजतागायत पुटपुटतो.

पण हा अध्याय एवढा ' गहन गूढ' असेल (इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयाऽनघ' हे भगवंतानीच म्हटलेले आहे.) हे त्यावेळी कळलेही नसेल.पण या अध्यायातील तत्वज्ञान हेच 'गीता रहस्य' हे आज मोठेपणी अभ्यासताना कळले. असो.

१५व्या अध्यायात गीतेचे शास्त्र व जीवनाची कला दोन्हीही यात प्रतिपादन केली आहेत. गीतेचे शास्त्र या अध्यायात पूर्ण होते.भगवत् गीता ही इथेच पूर्ण झाली आहे. १६-१७ हे परिशिष्टांचे दोन अध्याय व १८वा गीता कळसाध्याय. 'एकाध्यायी गीता' च म्हटले आहे तिला. आतापर्यंत गीतेत जे जीवनाचे शास्त्र सांगितले, जे सिद्धांत सांगितले त्याची पूर्तता या अध्यायात झाली आहे. या अध्यायत परमार्थ पूर्ण झाला. वेदांचे सारे सार यात येऊन गेले. परमार्थाचे ज्ञान मनुष्याला करुन देणे हेच वेदांचे काम. ते या अध्यायात आले आहे. म्हणून याला 'वेदांचे सार' अशी गौरवाची पदवी प्राप्त झाली आहे असे विनोबाजी म्हणतात.

महाभारताप्रमाणेच भगवद्‌गीतेतील अध्यात्मज्ञानही उपनिषदास धरुन आहे. इतकेच नव्हे तर गीतेतला भक्तीमार्गही या ज्ञानाला न सोडता सांगितला आहे.(अ.९) आठव्यातील अक्षरब्रह्मस्वरुप आणि तेराव्यातील 'क्षेत्रक्षेत्रज्ञ' विचार हे विषय अक्षरशः उपनिषदांच्या आधारे गीतेत वर्णिले आहेत. म्हणून गीता व उपनिषद यांचा संबंध आहे. असे गीतारहस्यात लो. टिळकांनी म्हटले आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या दृष्टीने हा अध्याय ज्ञानकाडांचा व पर्यायाने गीताशास्त्राचा शेवटचा व महत्त्वाचा अध्याय आहे. संसाराचे मिथ्यत्व दाखवून व जीवाला आत्मस्वरुपाची प्राप्ती करुन देऊन त्याच्या मागची जन्ममरणाचा फेरा संपविणे हा या अध्यायाचा विषय आहे.

मागील अध्यायाच्या शेवटी ज्ञानानेच मोक्ष प्राप्त होतो असा सिद्धांत भगवतांनी सांगितला आहे. ते ज्ञान कायम टिकवण्यासाठी अंगी वैराग्य असणे अत्यंत आवश्यक आहे. हा संसार अनित्य व क्षणभंगुर आहे हे जर मनाला पटेल तरच वैराग्य स्वाधीन होईल. म्हणून हा संसार कसा आहे हे अध्यायाच्या सुरवातीलाच 'अश्वत्थ वृक्षाच्या' रुपकाने भगवंतानी वर्णन करुन सांगितले आहे.

आपल्या स्वरुप प्राप्तीच्या आड जर कोणी येत असेल तर हा प्रपंच. हा प्रपंच एक बळकट वृक्ष आहे. 'अश्वत्थ' म्हणजे वड डेरेदार, घनदाट हिरव्या गार पानांनी बहरलेला. इतर लौकिक वृक्षांना खाली मूळ व वर फांद्या असतात त्यामुळे त्याचा अंत लागतो. त्याच्या मुळाशी

घाव घातला तर तो तोडताही येतो. पण हा वृक्ष उलटा आहे, त्याचे मूळ वर आहे व फांद्या खाली आहेत. त्यामुळे त्याचा अंत लागत नाही व तोडताही येत नाही. वडा पिंपळाप्रमाणे याच्या पारंब्यामध्येही डहाळ्या आहेत. हा कधीही नाश पावत नाही. वेद ही याची सुंदर पालवी आहे. अशा या संसाररुपी अश्वत्थ वृक्षाच्या सत्व, रज, तम या तीन गुणांनी वाढलेल्या आणि शब्दस्पर्शादी विषयांच्या पालवीने फुटलेल्या शाखा खाली व वरती पसरलेल्या आहेत. कर्मबंधरुपी याची मुळे खाली मनुष्य लोकात सर्वत्र पसरली आहेत. त्याचे रुप दिसत नाही. अंत व आरंभही दिसत नाही. अशा या अश्वत्थ वृक्षाला अनासक्तीरुप तीक्ष्ण ज्ञानखड्गाने तोडता येते. याचे यथार्थ रुप जो जाणतो तोच वेदांचे रहस्य जाणू शकतो. अशा रीतीने हा वृक्ष तोडल्यावर ज्या पदाच्या ठिकाणी पोचलेले पुरुष परत येत नाहीत त्या आद्य पदाचा शोध घ्यावा. म्हणजे काय करायचे-

**सत्व - रज-तम (त्रिगुण)**

| सत्वाचे पोषण व विकास करायचा | रज-तम मारायचे |
|---|---|
| विधायक काम | विनाशक काम |
| बी पेरणे | गवत काढणे |

दोन्ही मिळून एकच मार्ग एकाच क्रियेचे दोन अंग.

यासाठी विनोबाजी रामायणातले सुंदर उदाहरण देतात.

| रावण | कुंभकर्ण | बिभिषण (तीन भाऊ) |
|---|---|---|
| रजोगुण | तमोगुण | सत्वगुण |

आपल्या शरीरात या तिघांचे 'रामायण' चालू असते. रावण व कुंभकर्णाचा नाश व बिभिषणाचा विकास (तत्वाचा) म्हणजेच गुणातीत होणं. स्व-रुप ओळखणे - आत्मानुभूती घेणे. हे साधले की त्रिगुणातीत परमात्म्याचे दर्शन त्याला घडते. विश्वात भरलेला परमात्मा त्याला दिसतो. परम-आत्मा नि आत्मा एकच आहेत हे कळल्यावर आपले व परमात्म्याचे नातेही त्याला उलगडते. (साधकाला) आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे हा साक्षात्कार त्याला होतो. ह्याच विषयाचे विवरण संपूर्ण अध्यायात केलेले आहे.

या प्रपंच वृक्षाला आदिअंत नाही परंतु त्याचे स्वरुप टिकणारे नाही. मनुष्य लोकात कर्मानुसार 'उर्ध्व व अधो' अशा त्याच्या शाखा वाढत जातात. पहिली पाने, फांद्या गळून नवीन कधी आल्या ते कळतही नाही तो सारखा बहरलेला दिसतो. या वृक्षाला ज्ञान व वैराग्याने छेदता येते नंतर जेथून परत फिरता येत नाही अशा त्या मूळ चैतन्याला (आदीह बीजाला, परमात्म तत्वाला) आद्य पुरुषाला शरण जावे. ज्यांनी मोह-क्रोध-आसक्ती जिंकलीय ते या अविनाशी पदाला पोचतात. या पदाला सूर्य-चंद्र-अग्नि प्रकाशित करू शकत नाहीत असे ते 'परमधाम' आहे. तेथून कोणी परत फिरत नाही.

जीव हा माझाच अंश आहे. तो जन्मताना मन व सूक्ष्म इंद्रिये (म्हणजेच लिंग शरीर) बरोबर घेऊन येतो व जाताना (शरीर सोडताना) फुलातून वारा जसा सुगंध नेतो तसे लिंग शरीर घेऊन जातो. हा जीवात्मा कान, डोळे, त्वचा, जीभ, नाक आणि मन या ठिकाणी स्थित होऊन विषयांचा उपभोग घेतो. या जीवाला अज्ञानी लोक जाणत नाहीत ज्ञानीच फक्त जाणतात.

परमात्म्याचे स्वरुप वर्णन १२ ते १५ मध्ये आलेले आहे. ते असे - चंद्र-सूर्य-अग्निचे तेज माझेच. मीच पृथ्वीत शिरुन (प्रकाश किरण रुपाने) भूतांना धारण करतो व

चंद्र होऊन औषधी वनस्पतींचे पोषण करतो. मी वैश्वानर रुपी अग्नि होऊन देहात प्राण-अपान (वायू) सह चतुर्विध अन्नाचे म्हणजे भक्ष्य-चावून खाण्याचे अन्न, चोष्य-चोखण्याचे अन्न, लेह-चाटण्याचे अन्न, पेय-पिण्याचे अन्न याचे पचन करतो. क्षुधा-जठराग्नि हे अग्निचेच रूप. सर्वांच्या ह्रदयात मी असून स्मृती-विस्मृती, ज्ञान-अज्ञान ही माझ्यापासूनच होतात. सर्व वेद जे काय जाणतात ते मीच. वेदांचा कर्ताही मीच व जाणणाराही मीच.

प्रपंच वृक्ष प्रतिक्षणी विनाश पावतो नि नित्य नवा जन्मत असतो. नदीचा प्रवाह अखंड वाहतो. पहिले पाणी वाहून जाते. नवे येत राहते. आपल्याला नदी वाहताना दिसते. तसाच प्रपंचाचा प्रवाह अनादिकालापासून अनंत कालापर्यंत चाललेला आहे. प्रतिक्षणी तो नव्याने जन्मतो व मरतो. अश्वत्थ वृक्ष (पिंपळ किंवा वटवृक्ष) सहस्र वर्षे टिकतात त्याच्या पारंब्या भूमीत जातात त्या वाढतात. वृक्ष तोच आहेसे वाटते. पण त्याचे शेकडो वर्षांचे टिकणे आभासात्मक आहे. पहिले वृक्ष जाऊन नवीन तयार होत असतात. वृक्ष टिकलेला दिसतो. जसे कुल टिकते पूर्वीची माणसे जातात (आजे-पणजे-खापर पणजे वगैरे). नवी मुले नातवंडे, पतवंडे जन्मास येतात. म्हणून प्रपंचास अश्वत्थ, (जो दुसरे दिवशी टिकत नाही तो) अशाश्वत वृक्ष म्हणतात. विनाश व विकास ही शृंखला चक्राप्रमाणे अव्याहत चालू आहे. समाज-गाव तसेच दिसते. माणसे बदलतात. जुनी जातात नवी येतात. स्थिरतेचा हा आभास गतिमानतेमुळे होतो, असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. वेगाने धावणाऱ्या मोटारीचे चाक स्थिर दिसते. अत्यंत वेगामुळे स्थिरता भासते. सृष्टीतील प्रत्येक वस्तूचे स्वरूप क्षणाक्षणाला बदलते. आपण पण बाल्य-तारुण्य-वृद्धत्व असे दर दिवशी कणाकणाने बदलत असतो. परिवर्तन हा सृष्टिचा नियम आहे.

'परब्रह्म' हा विश्वचक्राचा प्रारंभ बिंदू व अंतिम बिंदू. ब्रह्म म्हणजे वृहत होणारे, वाढणारे, विस्तारणारे ('वाढता वाढता वाढे') असे. त्याचा विस्तार आकलनापलिकडचा आहे. 'तिथे मार्गीचा कापडी महेशु अर्जुनी' असे ज्ञानदेवांनी म्हटले आहे. जीव-जगत-जगदिश्वर ह्याचे चिंतन हा वेदांचा विषय. हे जो जाणतो तो वेदान्ती. परब्रह्म म्हणजे चितसूर्य-प्रकाशाचा-तेजाचा सागर-दर्या. प्रथम चिद्वृत्ती-असे महत तत्व प्रगट होते नंतर त्रिविध अहंकार मग चतुर्विध अंत:करण मग पंचमहाभूते. म्हणजे विश्व चैतन्यातून जडाकडे, सुक्ष्मातून स्थूलाकडे असे त्रिगुणात्मक विश्व प्रगट होते. त्रिगुणातून कर्मविस्तार यातून मनुष्याच्या वर देव, यक्ष, गंधर्व, किन्नर वगैरे योनीविस्तार व खाली पशु,पक्षी, वृक्ष, पाषाण इ. विस्तार. खालची सृष्टी कर्म करताना दिसते वरची मात्र दिसत नाही. त्याचे स्वरुप दिव्य विद्युन्मय असावे. साधू-संत योग्यांना त्याचे ध्यानात दर्शन होते. रामायण, महाभारतात मात्र अनेकदा या योनीतील देवदेवतांचा मानवाशी संपर्क आलेला दिसतो. (याचे कारण रामायणात 'राम' व महाभारतात 'कृष्ण' हे प्रत्यक्ष परब्रह्माचे अवतारच सगुणात वावरत होते हेही असू शकेल.)

जन्म-मृत्यूचे आपले जीवनचक्र कर्मामुळे फिरत राहते. त्यामुळे संसार वृक्षाच्या फांद्या फांद्यावरुन कधी वर तर कधी खाली अशी जीवाची भटकंती चालूच राहते. यातून मुक्त होण्यासाठी प्रपंचाचा प्रारंभ ज्या परमात्म तत्वापासून झाला त्याला शरण गेले पाहिजे, अनन्य झाले पाहिजे. परमात्मज्ञान (आत्मज्ञान) झाल्याशिवाय या प्रपंचातून सुटका नाही. निरासक्त, निर्मोही, स्थिरबुद्धी, द्वंद्वातील असे ज्ञाते पुरुषच या अव्यय स्थानाला जाऊन पोचतात. मग तिथून ते परत फिरत नाहीत.

प्रपंच पाऱ्यासारखा हातातून निसटतोच. मग अशा या प्रपंचाचा मोह धराच का? जे टाकावे लागणार आहे त्याची आसक्ती ठेवलीच नाही तर तो सोडून जाताना

दुःखही होणार नाही. तरी पण आम्ही देहाचेच पुजारी असतो देवाचे नसतो.

परमात्म्याची अनुभूती यायला प्रथम आत्मानुभूती यायला पाहिजे. इंद्रिय पातळीवरून ती येणे आवश्यक नाही. आत्म्याच्या पातळीवरून ती येऊ शकते. आपले स्व-रुप आपणच पाहणे म्हणजे आत्मदर्शन गुणातीत, निरासक्त, अहंकारापलिकडे जाणे म्हणजे आत्मानुभूती घेणे. आपला देहाचा परीघ व्यापक करणे, आकशाएवढे होणे म्हणजे परमात्मज्ञान होणे. भगवंत सतत म्हणतात की माझा अनन्य भक्त हो म्हणजे भगवंताशी तादात्म्य होईल, एकरुपता येईल, हीच सायुज्य मुक्ती, हाच मोक्ष. हेच विश्वात्मक व्यक्तिमत्व.

सागरात लाट, घटात आकाश, सूर्याचे किरण, अग्निच्या ठिणग्या तसाच जीवात्मा परमेश्वराचा अंश. मन व सूक्ष्म पंचेंद्रिये मिळून हा 'मी' जीवात्मा होतो. देहात दाखल होऊन तो नाक, कान, डोळे, त्वचा, जीभ व मन या द्वारे तो विषयोपभोग व सुख दुःखाचे अनुभव घेतो. बीजात जसा सूक्ष्म रुपात संपूर्ण वृक्ष साठवलेला असतो तसा गर्भबीजात संपूर्ण देह सूक्ष्म रूपात साठवलेला असतो. बीजाला कोंभ फुटतात तसे गर्भबीजाला अवयव फुटतात. मागील जन्माचे संस्कार घेऊन जीवात्मा येतो व या जन्माचे संस्कार घेऊन मृत्यूनंतर पुढील जन्माची वाटचाल करतो.

क्षर पुरुष, अक्षर पुरुष हे दोन पुरुष जगातले खरे पुरुष. क्षर पुरुष म्हणजे सर्व भूते; आणि या भूतात राहणारा (कूटस्थ-अनाकलनीय) अक्षर पुरुष. उत्तम पुरुष या दोन्हीहून भिन्न. त्याला परमात्मा म्हणतात. तोच अव्यय ईश्वर त्रैलोक्यात भरलेला असून तो त्रैलोक्याचे पोषण करतो. क्षराच्याही पलिकडचा व अक्षराहून उत्तम पुरुष आहे. तो लोकव्यवहारात व वेदान्तामध्येही 'पुरुषोत्तम' म्हणून प्रसिद्ध आहे. पुरुषोत्तम म्हणजेच उत्तम पुरुष. परतत्व. विश्वात परमात्म तत्व पाहणे. आत्म्यापासून भक्तीचा प्रवाह विश्वातील परमात्म तत्वाकडे वाहतो. 'सोऽहं'ची अनुभूती घेतलेला 'मी' व विराट विश्वात नटलेला पुरुषोत्तम याची एकरुपता-एकात्मता. पती+पत्नी, नदी+सागर यात अशीच एकात्मता असते. हीच भक्ती. हाच ज्ञानवान भक्त. त्याला चारी पुरुषार्थ प्राप्त होतात. तो कृतार्थ होतो. जीवनास परिपूर्णता येते. सारे जीवन परतत्व स्पर्शाने चिन्मय होते. जीवनाची कला हाच पुरुषोत्तम योग. म्हणूनच या अध्यायास 'पुरुषोत्तम योग' हे नाव दिलेले आहे.

'चैतन्य' अविनाशी असूनही उपाधीमुळे (पंचमहाभूते + मन +बुद्धी+अहंकार या अष्टधा प्रकृतीला उपाधी म्हणतात. उपाधी म्हणजे बाह्य वस्तू. अलंकार ही देहाची उपाधी) ते विनाशी ठरते. 'क्षर' अशा उपाधी वाचून (देह) अवनाशी आत्मा प्रगट होऊ शत नाही. परमात्मा सुरवातीला एकच एक चैतन्याचा असीम सागर होता. मग त्यात स्फुरण झाले. 'एकोऽहं बहुस्याम' मग तोच उपाधी धारण करून अनेकत्वात प्रगट झाला. ब्रह्माचा मायेशी संबंध येऊन हे जगत जन्माला आले. पुन्हा एकात्मभावनेची जाणीव. वर्तुळाचा प्रारंभ बिंदू व अंतिम बिंदू एकच.

शेवटच्या १९-२० श्लोकात भगवंत म्हणतात. हे अर्जुना ज्ञानी पुरुष मला पुरुषोत्तमास जाणतो नि सर्व भावांनी मला भजतो. तुला मी हे अति गुह्य रहस्यमय शास्त्र सांगितले याचे तत्वतः ज्ञान करून घेतल्याने मनुष्य ज्ञानी व कृतार्थ होतो. भगवंताच्या बोलण्यातून ज्ञान व भक्ती एकत्र आली आहेत त्यामुळे भगवंत सुस्पष्टपणे ज्ञानोत्तर भक्ती सांगत आहेत. तसे चौदाव्यात ज्ञानोत्तर कर्मही आवश्यक आहे असे सांगतात.

'हे समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा प्रतीति रसाचा वोतला भावो ।

म्हणोनि भक्तामाजी रावो । आणि ज्ञानिया तोचि

॥ ज्ञानेश्वरी ॥

सर्वत्र एकच परमेश्वर आहे हे कबुल केल्यावर साधना संबंधाने गीतेचा कोणताही आग्रह नाही. (१२.२४ व २५) भक्तिमार्ग हा सुलभ अतएव सर्वांस ग्राह्य आहे असे गीतेत म्हटले आहे खरे तथापि इतर मार्ग त्याज्य होत असे कुठेही गीतेत म्हटलेले नाही. गीतेचा प्रतिपाद्य विषय हा आहे की मार्ग कोणताही असो, परमेश्वराचे ज्ञान झाल्यावर संसारातील कर्मेही लोकसंग्रहार्थ करावीत, किंवा नाही हा गीतेतील प्रमुख प्रश्न आहे. त्यावर जनक व स्वत:चे उदाहरण देऊन भगवंत लोकांना आदर्श म्हणून ज्ञानोत्तर कर्मे आवश्य आहेत असे सांगतात. (कर्मे निरासक्तपणे करून मला अर्पण करणे) गीता रहस्य अ -१४

विनोबाजी म्हणतात १५ व्या त सर्व विचारांची परिपूर्णता झालीय. भगवंत 'इति शास्त्रम्' म्हणतात म्हणजेच शास्त्र पुरे झाले. व्यक्तीमधील चैतन्य व विश्वातील सर्व वस्तूजातातील चैतन्य ही दोन्ही एकच असून एकरूप व एकात्म आहेत, याची अनुभूती येणे इथे शास्त्र संपले.

विश्वरुपदर्शनानंतर अर्जुनाने पुन्हा सगुणरुप दाखव अशी प्रार्थना केली म्हणजे त्याला कृष्णही हवा व विश्वही हवे. प्रकृती जीवंत राहू दे. सारे सगुण साकारच दिसू दे ! ही प्रार्थना फक्त अर्जुनाचीच नव्हती तर साऱ्या मानव जातीची होती. तरी भगवंत त्याला सांगतात - तू 'क्षेत्र' नाहीस 'क्षेत्रज्ञ' आहेस आणि क्षेत्रज्ञ ही अवस्था गुणातीत अवस्था आहे. अर्जुनाला भगवंताने सांगितले की तू सगुणाची भक्ती कर पण मन निर्गुणीत ठेव. सगुणाने कधीतरी निर्गुणीत गेलेच पाहिजे. असे हे गूढ रहस्य भगवंत सांगत आहेत. जीवन ज्ञानपूर्ण व कृतार्थ व्हायला हवे. ही ज्ञानपूर्णता व कृतार्थता साक्षात्कारात आहे, असे भगवंत सांगतात. हा साक्षात्कार व्हायला हवा परंतु परमात्म्याचा साक्षात्कार हा भयभीत करणारा अस्तित्व विरघळवणारा आहे म्हणून मानवाला तो नकोसाही वाटतो.

या अध्यायात असंगशस्त्राने हा प्रपंच वृक्ष तोडायचा परंतु विश्व ठेवून त्याच्या मुळावर घालायचा. हेही एक गूढच आहे. 'सगुण रक्षुन निर्गुणास गावे' रामदास. याचा अर्थ स्थूल रुपात, विश्व पहायचे नाही. अज्ञानामुळे विश्वात स्थूलता-जडता-साकारता अनेकता, क्षणभंगुरता दिसते. ज्ञान खड्गाने हे मायेचे दर्शन तुटून पडेल. मग हेच विश्व चिन्मय दिसेल. सारी भूते दिसणार नाहीत तर त्यातील परमात्मदर्शन घडेल. परमात्म्याचा ऐश्वर्ययोग दिसेल. म्हणून विश्वाचे स्थूल दृष्टीने दर्शन घ्यायचे नाही. विश्वाचे प्रत्यक्ष चैतन्यात रुपांतरही करायचे नाही तर 'अनंत वेशे अनंत रुपे पाहिला म्या त्यासि ।' या ज्ञानेश्वरांच्या दृष्टीने विश्वाकडे पहायचे.

त्यामुळे विश्व राहील पण त्याचे स्वरुप बदलले. विश्वात एकात्मता दिसेल व चित् सूर्यांचे दर्शन होईल. मानवाला घरटे पण हवे व आकाशही हवे. म्हणजे मानवाला प्रपंचही हवा व परमात्माही हवा. मानवी मनाच्या या सर्व प्रवृत्ती पूर्ण करण्याच्या विचाराने भगवंत या रहस्याचा उलगडा करतात. मानवाला 'सोऽहं'ची अनुभूती येईल तेव्हा तो ईश्वराचा अंश बनून जाईल. परमात्मा जसा विश्वाचा स्वामी तसा मनुष्य स्वत:च्या विश्वाचा स्वामी (देहाचा) बनून जाईल. त्यासाठी तुझे हे देहकेंद्रित व्यक्तिमत्त्व लोप पावले पाहिजे. त्यासाठी तू मन + बुद्धी + अहंकार मला अर्पण कर. म्हणजेच माझा अनन्य भक्त हो. मग तू माझा अंश बनून जाशील. अशी आत्मानुभूती येणे हे ही जीवनाचे गूढ रहस्य आहे. परस्परात कालवण्याचा, असीम समाधानाचा भाव भक्ती प्रवाह येथे सुरू होतो. हीच समर्पणाची भवना पती-पत्नीतही असते. एकरुप झाल्यामुळे दोघांचा अहम् गळलेला असतो. येथे प्रकृती एकात्मतेचा आनंद भोगण्याचे साधन ठरते.

हा १५ वा अध्याय भगवतगीतेचे सार आहे.

सत्व-रज-तमांनी भरलेला संसार असंगशस्त्राने तोडून टाका. रज तमाचा निरोध करा. सत्वाचा विकास करून पवित्र व्हा.

पण सत्वाची अहं व आसक्ती जिंकून अलिप्त रहा. त्यासाठी कमळाचा आदर्श भगवत गीता मांडते. कमळ भारतीय संस्कृतीचे प्रतीक, उत्तम विचार प्रगट करण्याचे चिन्ह, भारतीय संस्कृतीत जीवनातील आदर्श वस्तूस, उत्तमोत्तम वस्तूस कमळाची उपमा देतात, कमळ हे निर्मळता, पवित्रता, अलिप्त सुंदरता याचे प्रतीक. भगवंताच्या सर्व अवयवांना कमळाची उपमा देतात. नेत्र कमळ, पद कमळ, मुख कमळ, नाभिकमळ, शिरकमळ, कर कमळ, हृदय कमळ वगैरे.

यातून सर्वत्र सौंदर्य, पावित्र्य, अलिप्तता आहे हे दाखवायचे व आपल्या मनावर ठसवायचे आहे. मागील अध्यायात सांगितलेल्या साधनेला या अध्यायात पूर्णता आणण्यासाठी हा अध्याय आहे. प्रयत्नात भक्ती व आत्मज्ञान मिसळली गेली की ही पूर्णता आणणारी तत्वे आहेत, असे या अध्यायात सांगितले आहे. म्हणून एकाग्र चित्ताने या भक्ती ज्ञानाचे स्वरुप श्रवण करा.

भक्ती (प्रेम) ज्ञान-कर्म या तीन गोष्टींनी जीवनतील सारी कर्मे करता येतात. तिवईचा दृष्टांन्त यासाठी विनोबाजी देतात. तीन पायापैकी एकही तुटला तर ती उभी राहू शकत नाही. भक्ती-ज्ञान-कर्म म्हणजे श्रमसातत्य. या तीन पायावर जीवनाची द्वारका उभी करायची आहे. भक्ती भाव असला की कष्ट आनंद रुप होतात. आई प्रेमामुळे मुलाला जन्म देण्याचे वाढवण्याचे कष्ट आनंदाने करते. जीवनाची नौका वाळूवरून किंवा खडबडीत जमिनीवरून ओढायला कष्ट पडतील पण त्या नौकेखाली भक्तीचे पाणी असेल तर नौका पैलपार विनासायस जाईल. (केलेले परिश्रम जाणवणार नाहीत.) भक्तीमार्ग सोपा का? तर त्यात भक्तीमुळे कर्माचा बोजा वाटत नाही. भक्तीमार्गाने साधनेला सुलभता येते. अव्याहत प्रयत्नाने एक दिवस आत्मदर्शन होईल. तोपर्यंत प्रयत्न चालू ठेवायला हवेत. ही परमपुरुषार्थाची गोष्ट आहे. ही गमतीची गोष्ट नाही की जे सहज मजेने साध्य होईल. त्यासाठी साधनेत खंडता हवी. निराशा व अधिरता नको. सत्व सातत्य हवे भक्ती हे भाव (निराशा, अधिरता वगैरे) उत्पन्न होऊ देणार नाही. भक्तीत उत्तरोत्तर सतत उल्हास व उत्साह वाटावा यासाठी या अध्यायात फार सुंदर विचार मांडला आहे

❁ सेव्य ❁ सेवक ❁ सेवा साधने ही त्रिपुटी.

❁ सेव्य - देव ❁ सेवक - मी (भक्त) ❁ सेवा साधने - ही सृष्टी. (कर्माची फुले, नैवेद्य, धूप दीप वगैरे) सर्व कर्मे पूजा द्रव्ये - समजायची ही गीतेची शिकवण.

जीवनातील सर्व कर्मात ज्ञान व भक्ती ओता हाच पुरुषोत्तम योग - विनोबाजी.

मी पुरुष - तो पुरुष - हाही पुरुष म्हणजे मी सेवक अक्षर पुरुष, तो सेव्य परमात्माही अक्षर पुरुष व ही सेवासाधन सृष्टीही पण जड नाही तर चैतन्याचाच अंश. भक्ती व ज्ञान ही एकाच वस्तूची दोन नावे. प्रेमाचे बाह्यरुपसेवा. ज्याठिकाणी ज्ञान त्याठिकाणी भक्ती (प्रेम) असतेच. (एकरुपता) दगडाचाच देव, दगडाचेच मंदिर तिन्ही पुरुष अखेर एकच. एकरुप असून भक्ती प्रेमाचा खेळ खेळायचा. जीवन सेवापरायण झाले पाहिजे.

सव्य असा पुरुषोत्तम. त्याचा सेवक मी अक्षर पुरुष. रामापुढे कसा हनुमान सदैव हात जोडून उभा आहे तसा परमात्म्याच्या सेवेसाठी हा अक्षर पुरुष सेवक (मी) सदैव उभा हवा. प्रभू सेवा घेऊन दमतो की मी सेवा करून दमतो. जितके त्याचे अवतार तितके माझे. लागू दे ना अशी चढाओढ. प्रत्येक (क्रिया) कर्म म्हणजे पुरुषोत्तमाची

पूजा. त्यासाठी सेवक मी अक्षर पुरुष, सेव्य-देव व सेवासाधन - ही सृष्टी क्षर नाशिवंत अशी. त्यामुळे तर सृष्टीत नित्य नूतनता आहे. रोज नवी ताजी फळे, ताजे पाणी तसेच देहाचे वस्त्र पण नवे हवे. ते जीर्ण जुने नको (मृत्यूची भीती नको) नाशीवंतपणामुळे नूतनतेचे सौंदर्यच आहे.

चंद्राची कला बदलते. नदीचे पाणी अखंड वाहते म्हणनू ताजे, स्वच्छ, निर्मळ वाटते. सृष्टीचे रुपही नित्य बदलणारे. माणसाचे रुप सुद्धा बदलणारे जन्मापासून मरेपर्यंत. नवनवीन साधनांमुळे सेवेची हौस वाढते. सेवावृत्ती वाढते. विनोबाजी म्हणतात. मुलांना एकच एक 'क' गिरवायला कंटाळा येतो. पण नंतर नवी नवी पुढची अक्षरे ती पटापट शिकतात.

सकाळी एकदा व संध्याकाळी एकदा आपण देवाची पूजा करतो, स्तोत्र म्हणतो, पोथी वाचतो. पण गीतेला एवढ्याने समाधान नाही. तर उठल्यापासून झोपेपर्यंतच्या सर्व क्रिया (कर्मे) ही परमेश्वरासाठी म्हणूनच व्हायला हवीत. सारी कर्मे पूजा कर्मे व्हायला हवीत. सर्व पूजाद्रव्ये ताजी, टवटवीत तसा माझा परिसरही स्वच्छ, सुशोभित, पवित्र, निर्मळ ठेवायला हवा, माझे इतरांशी वागणे-बोलणे गोड हवे कारण (सर्वाभूती परमेश्वर) तमाम कर्मे म्हणजे प्रभू पूजाच.

गीतेला घटका दोन घटका पूजेचे समाधान नाही तर संपूर्ण जीवनच हरिमय व्हायला हवे. जीवनाच्या सर्व कर्म फुलांनी परमात्म्याची पूजा करावी ही गीतेला हौस आहे, हव्यास आहे. हाच पुरुषोत्तम योग. अखंड सेवा, हरिमय जीवन, 'अहम्'चा लोप, परोपकारी वृत्ती. कर्ममय जीवनाला 'पुरुषोत्तम योग' सांगून गीता पूर्णता देत आहे.

क्षर व अक्षर पुरुषांहून वेगळा श्रेष्ठ, उपाधीरहित व एकाकी असा आणखी एक तिसरा उत्तम पुरुष आहे. तो प्रगट झाला असता या दोन्ही पुरुषांना त्यांच्या उपाधींसह नाहीसा करतो. मी ब्रह्म आहे या ज्ञानाने, मी देह आहे. हे अज्ञान नाहीसे होते व पुढे मी ब्रह्म आहे हे ज्ञानही त्या ठिकाणी नाहीसे होते. ते या उत्तम पुरुषाचे रुप आहे. या ठिकाणी द्वैत तर नाहीसे होतेच. पण अद्वैतही नाहीसे होते. रहात नाही यालाच परमात्मा म्हणतात. याचे दर्शन झाल्यावर पहाणाराच नाहीसा होतो. (म्हणजे परमात्मरुप होतो. मग त्याचे वर्णन कोण करणार? विश्व नाहीसे झाले तरी हा नाहीसा होत नाही. हा विश्वाला धारण करतो. त्याच्या सत्तेने जग चालते व त्याच्या प्रकाशाने जग भासते. तो सदा सर्वत्र आहेच.

हे जग मिथ्या आहे व आपणच ब्रह्म आहे हा अनुभव येतो. (आत्मज्ञान होते) तेव्हाच माझे भजन करण्याची योग्यता येते. मद्रुप झाल्याशिवाय माझे यथार्थ ज्ञान होऊच शकत नाही. हे वेदांचे सार माझे गुह्यातले गुह्य ज्ञान तू श्रद्धावान, एकनिष्ठ व शुद्ध बुद्धीचा आहेस म्हणून तुला सांगतले. गीता ग्रंथ पांडित्य दाखवणारा नाही तर त्यातील तत्व सर्वार्थाने जाणण्याचा व अनुभवण्याचा ग्रंथ आहे. हा ग्रंथ जर याप्रमाणे जाणला तर जीवाचा मोह दूर होईल व जीव कृतकृत्य होऊन त्यास अक्षय पदाची प्राप्ती होईल. इथे हे गीता शास्त्र संपले.

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
फोन : २५४१०१४०

•••

# ग्रंथप्रेमी बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथालय

*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथप्रेम हे सर्व अर्थांनी जगावेगळे होते. त्यांच्या या ग्रंथावरील प्रेमाबद्दल या लेखात माहिती मिळेल. - संपादक*

डॉ. बाबासाहेब हे प्रखर ज्ञानयोगी, प्रकांडपंडित व समाजसुधारक होते. त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचे खरे रहस्य त्यांची अविरत ज्ञानोपासना हेच होय !

डॉ. बाबासाहेबांनी बालपणीच रामायण, महाभारत इ. धार्मिक ग्रंथांची पारायणे केली. मोरोपंत, मुक्तेश्वर, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम आदी संतांचे काव्य, अभंगांचे पाठांतर केले. तर्खडकरांची भाषांतर पाठमाला व हॉवर्डची पुस्तके ह्यांच्या साहाय्याने बाबासाहेबांचा इंग्रजी विषय चांगलाच झाला होता. बालपणापासून वाचन, मनन व पाठांतर यामुळे डॉ. बाबासाहेबांची बुद्धी व स्मरणशक्ती तल्लख झाली.

डॉ. बाबासाहेबांना लहानपणापासून वाचनाची गोडी लागली. वाचनाचा छंद वाढू लागला. नवीन पुस्तक दिसले की ते वाचण्याची त्यांना उत्कट इच्छा होई. वडिलांकडे हट्ट धरून ते नवीन पुस्तक मिळवीत व ते वाचीत. डॉ. बाबासाहेबांनी जे पुस्तक मागितले असेल ते पुस्तक त्यांचे वडिल त्यांना आणून देत. विद्येने माणसाला श्रेष्ठत्व येते आणि मनाचा मोठेपणा वाढतो, अशी त्यांची मनोभावना असल्याने स्वतःजवळ पैसे नसले तरी दागिने गहाण ठेवून मिळणाऱ्या पैशांनी ते मुलासाठी पुस्तक विकत आणून देत व त्याचा वाचनाचा छंद पूर्ण करीत. वडिलांनी नवीन पुस्तक आणले की बाबासाहेब रात्री जागून ते पुस्तक वाचीत. या वाचनाच्या छंदामुळे त्यांना वाटू लागले की आपल्या जवळ खूप पुस्तके असावीत, त्यांचा संग्रह करावा व खूप वाचावे.



शालेय अभ्यासावरोबर डॉ. बाबासाहेबांचे अवांतर वाचनही वाढू लागले. त्यात त्यांना आनंद मिळू लागला. १९१३ मध्ये अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी गेले असता दररोज १८/१८ तास अभ्यास करून एम्.ए.ची पदवी संपादन केली. कोलंबिया विद्यापीठात प्रा. सेलीग्मन व इतर विद्वान प्राध्यापकांच्या सहवासामुळे डॉ. बाबासाहेबांच्या वाचनाचा छंद खूप वाढला. त्यामुळे स्मरणशक्ती व विचारशक्तीही वाढत गेली. १९१६ साली पी. एच्.डी.साठी त्यांनी National Divident of India : A Historical and Analytical Study हा प्रबंध सखोल व सांगोपांग अभ्यास करून लिहिला. त्यावेळी युरोप, अमेरिका व आशिया खंडातील वृत्तपत्रांतून व मासिकांतून या प्रबंधावर अभिप्राय प्रकाशित झाले होते. अमेरिकेतील वास्तव्यात त्यांनी सुमारे दोन हजार ग्रंथांचा संग्रह केला. त्यासाठी रात्री एक कप चहा व पाव खाऊन ते अभ्यास करीत आणि पैशाची बचत करून ग्रंथ विकत घेत.

१९१६ साली डॉ. बाबासाहेब पुढील अभ्यासासाठी लंडनला गेले. अमेरिकेतील वास्तव्यात अतिकष्टाने त्यांनी सुमारे दोन हजार ग्रंथांचा संग्रह केला. लंडनला जाताना सर्व ग्रंथ व्यवस्थितपणे लाकडी खोक्यात बंद करून हिंदुस्थानात परत जाणाऱ्या आपल्या एका मित्राच्या हवाली केले. पण यातील काही ग्रंथ गहाळ झाले. उरलेले ग्रंथ मुंबईस पोहोचले. आपल्या ग्रंथांची जी दुरावस्था झाली ती कळल्यानंतर त्यांना अतिशय दुःख झाले.

लंडनला गेल्यानंतर बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याकडून उच्च शिक्षणासाठी मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची मुदत संपण्यापूर्वीच बाबासाहेबांना १९१७ मध्ये हिंदुस्थानात परत येण्याचा आदेश देण्यात आला. या काळात पहिले महायुद्ध चालू होते. बाबासाहेब प्रवासी बोटीने लंडनहून मुंबईस आले. लंडनहून निघण्यापूर्वी त्यांनी आपले अमेरिकेतून नेलेले ग्रंथ व लंडनच्या वास्तव्यात जमविलेले ग्रंथ खर्चाचा विचार करून मालवाहू बोटीने मुंबईला पाठविले. महायुद्धाच्या परिस्थितीमुळे जर्मनीच्या पाणबुड्या इंग्लंडच्या बोटींचा विध्वंस करीत. दुर्दैवाने ज्या बोटीतून डॉ. बाबासाहेबांचे ग्रंथ येत होते, ती बोट पाणबुड्यांनी उद्ध्वस्त केली. बोटीच्या आगमनाच्या दिवशी डॉ. बाबासाहेब बॅलार्ड पिअरवर मॅकीनॉन मॅकेन्झी कंपनीत आपले ग्रंथ ताब्यात घ्यावयास गेले असता ग्रंथ ज्या बोटीतून येत होते ती बोट बुडाली. हे वृत्त ऐकून त्यांना अतिशय दु:ख झाले. आपल्या दुर्मिळ ग्रंथांचा अशा रीतीने अंत झाल्याचे दु:ख झाले. डॉक्टर साहेबांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. कारण नष्ट झालेल्या दुर्मिळ व बहुमोल ग्रंथांची नुकसान भरपाई पैशाने होणारी नव्हती.

बडोदा सरकारच्या करारानुसार डॉ. बाबासाहेब बडोद्यास नोकरीस गेले. अस्पृश्यतेमुळे तेथील छळ व मानहानीला कंटाळून त्यांनी बडोद्याची नोकरी सोडली व मुंबईस येऊन सिडनहॅम कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी स्वीकारली. दीड दोन वर्षे नोकरी करून काटकसरीने राहून अपूर्ण राहिलेल्या शिक्षणासाठी पैसे जमविले व पुन्हा १९२० साली ते लंडनला गेले. तेथे ग्रंथालयात रात्रंदिवस अभ्यास करून 'The Problem of the Rupee' हा प्रबंध लिहून डी.एस्.सी.ची पदवी संपादन केली. त्याचबरोबर कायद्याचा अभ्यास करून बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण झाले. लंडनच्या वास्तव्यात अर्धपोटी तर कधी उपाशी राहून काटकसर करून त्या पैशातून अनेक दुर्मिळ व उपयुक्त असे नवे, जुने ग्रंथ जमविले.

सतत वीस-बावीस वर्षे हजारो ग्रंथांचा संग्रह केल्यानंतर ते ठेवायचे कोठे आणि कसे हा प्रश्न बाबासाहेबांसमोर उभा राहिला. ते ज्या चाळीत राहात ती जागा फार लहान होती. जमविलेली पुस्तके लाकडी खोक्यात भरून मिळेल त्या मोकळ्या जागी खोके ठेवून ग्रंथांची व्यवस्था केली. पण ग्रंथांच्या वाढत्या संग्रहाची व्यवस्थितपणे सोय व्हावी म्हणून परळ येथील दामोदर हॉलमध्ये सोशल सर्विस लिगच्या जागेत ग्रंथ ठेवण्याची व्यवस्था केली. डॉ. बाबासाहेब लंडनहून परत आल्यानंतर समाजसेवेच्या कार्यांबरोबर त्यांचे लेखन, वाचन, मनन सतत चालूच होते.त्याचबरोबर त्यांचा नवीन ग्रंथ घेऊन वाचण्याचा व्यासंगही वाढत होता. मुंबईतील थॅकर आणि कंपनी, न्यु बुक कंपनी, पॉप्युलर बुक डेपो या पुस्तकांच्या दुकानात सवड मिळेल तेव्हा जात आणि तासन्तास नवीन ग्रंथ शोधीत. तर कधी न्यू अँन्ड सेकंड हॅन्ड बुक स्टॉल किंवा महमद अली रोडवरील कोकीळ कंपनी किंवा पुरचुरे, पुराणिक बुक डेपो इ. पुस्तकांच्या दुकानातूनही जुनी पुस्तके विकत घेत. सतत नवीन ग्रंथ विकत घेणे व वाचणे यामुळे ग्रंथांचा संग्रह वाढत गेला.

डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथवेडाची परिसीमा म्हणजे आपल्या असंख्य ग्रंथांची व्यवस्था करण्यासाठी स्वत: वास्तुशास्त्राचा अभ्यास करून बांधलेले 'राजगृह' हे होय! दादरला हिंदु कॉलनीत १९३४ साली ८० हजार रुपये खर्च करून आपल्या अनमोल ग्रंथसंग्रहासाठी बांधलेली अद्ययावत इमारत म्हणजे खरोखर ग्रंथराजाचे गृह! केवळ ग्रंथांसाठी घर बांधणारे डॉ. बाबासाहेबांसारखे विद्वान पुरुष विरळाच. राजगृह बांधण्यापूर्वी वास्तुशास्त्राच्या तंत्रानुसार जागेच्या निवडीपासून तर इमारतीच्या कानाकोपऱ्याच्या रेखीव रचनेचे आराखडे त्यांनी स्वत: तयार करून घेतले होते. त्यासाठी त्यांनी उत्कृष्ट वास्तुशिल्पाचे अनेक आराखडे अभ्यासले. रोमन पद्धतीचे खांब व विस्तृत पोर्च आणि पायऱ्यांची रचना, जुन्या इंग्लिश इमारतीप्रमाणे नक्षीदार लाकडी जिना असलेल्या भव्य वास्तूच्या पहिल्या

मजल्यावर भव्य ग्रंथालयाची व्यवस्था केली होती. ग्रंथालयातील अनेक कपाटात सेल्फवर ग्रंथांची विषयवार मांडणी केली होती.

डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथालयात सुमारे ३२ हजार दुर्मिळ ग्रंथ व उपयुक्त ग्रंथांचा संग्रह होता. त्यात अनेक विषयावरील दर्जेदार उत्कृष्ट ग्रंथ होते. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, तर्कशास्त्र, नीतीशास्त्र, तत्वज्ञान, कायदा, शिक्षण, लोकजीवन, इतिहास, संस्कृती, चित्रकला, शिल्पकला, सर्व धर्मांचे धर्मग्रंथ, अनेक थोर पुरुषांची चरित्रे इ. अनेक विषयांच्या ग्रंथांनी हे ग्रंथालय समृद्ध झाले होते. अशा मौलिक, दुर्मिळ व असंख्य ग्रंथांनी नटलेल्या राजगृहात प्रकांडपंडित, ज्ञानयोगी, ग्रंथप्रेमी युगपुरुष डॉ. बाबासाहेब निवास करीत. डॉ. बाबासाहेबांचे हे राजगृह म्हणजे विशाल ज्ञानमंदिरच. या ज्ञानमंदिरात डॉ. बाबासाहेब रात्रंदिवस सातत्याने वाचन मनन चिंतन व लेखन करीत. त्यांची ज्ञानलालसा अतुलनीय होती. प्रत्येक क्षण सोन्याचा समजून वाचनात घालवीत. वाचनात एकदा दंग झाले की त्यांना जगाचे विस्मरण होई. वाचताना एखादे चांगले अवतरण किंवा विचार आढळला की त्यावर निळ्या पेन्सिलीने खुणा करीत. ते वाक्य अनेकदा वाचून आत्मसात करीत. जे काही वाचीत ते मोठ्या आत्मीयतेने, आवडीने व जिज्ञासेने वाचीत. त्यांचे मनन करीत. त्यातूनच त्यांनी आपले अनेक विषयांचे ज्ञान वाढविले. लेखनातून, वक्तृत्वातून, वादविवादातून आपली विद्वता सिद्ध केली आणि आपले महान तेजस्वी व्यक्तित्व घडविले.

डॉ. बाबासाहेबांचे ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचा खजिना होता. विद्याव्यासंग ही त्यांची प्रभावी शक्ती. त्यांच्या वाचन मननानेच त्यांचे सार्वजनिक जीवन अतिसमृद्ध झाले. त्यांना जी शक्ती प्राप्त झाली होती ती त्यांच्या अनेक सद्गुणांबरोबर त्यांच्या विद्याव्यासंगामुळे झाली होती. ना धनसंपत्ती ना राजसत्ता केवळ विद्याव्यासंग. सखोल वाचनामुळे प्राप्त झालेल्या बौद्धिक शक्तीमुळे त्यांनी जगाला थक्क केले होते.

डॉ. बाबासाहेबांचे राजगृह म्हणजे अद्वितीय ज्ञानलालसेचे व महान ग्रंथ निर्मितीचे स्फूर्तीस्थान. १९३९ मध्ये एडिंबरो येथील एक विद्वान युरोपीयन ख्रिस्तीधर्म प्रचारिका मिस. ए.एम्. ऑर्कनी भारतात मिशनरी कार्य करीत असताना राजगृहाला भेट देण्यास आली. त्या श्रेष्ठ ग्रंथालयाचे दर्शन घेऊन आणि डॉ. बाबासाहेबांना भेटून प्रसन्नतेने त्या म्हणाल्या, 'O God ! I can't dream, I can't imagine, I saw a wonderful Library and a wonderful man. What a great! What a splendid in the world ! A noble gift to India. That is Rajgriha and Dr. Ambedkar. A highest temple of knowledge and holiest worshiper !

श्रीमती आर्कनी यांच्या उद्गारातच डॉ. बाबासाहेबांच्या महान ज्ञानसाधनेची, साहित्यसाधनेची, व्यक्तित्वाची व कर्तृत्वाची प्रतिमा साकार झाली आहे. 'राजगृहातील असे व्यक्तिगत ग्रंथालय दुसरीकडे कुठे पहावयास मिळाले नाही.' असे प्रांजल मत अनेक भारतीय व पाश्चात्य व्यक्तींनी राजगृहाला भेट दिल्यानंतर काढले होते. कविवर्य रविंद्रनाथ टागोर, बॅ. मुकुंदराव जयकर, पंडित मदनमोहन मालवीय, न्यायमूर्ती काशिनाथ तेलंग, श्रीधर भांडारकर, रावसाहेब विश्वनाथ मंडलीक, पंडित जवाहरलाल नेहरू इत्यादी अनेक व्यक्तींनी व्यक्तिगत ग्रंथालये निर्माण केली होती. पण ही ग्रंथालये धनिकांची होती. बाबासाहेबांचे ग्रंथालय स्वकष्टाने, स्वत: उपाशी राहून पैसे जमवून, हालअपेष्टा सहन करून संपन्न केले होते. त्यांना एकच छंद, एकच व्यासंग. हवी ती पुस्तके विकत घेऊन संग्रह करावयाचा आणि त्यांचे सातत्याने वाचन, मनन करावयाचे.

डॉ. बाबासाहेब लंडनहून भारतात परत आल्यानंतर मुंबईत २०/२५ वर्षे सतत समाजजागृती, चळवळी,

वकीली, नोकरी, राजकारण, समाजकारण यांचा व्याप सांभाळून लेखन वाचनाचे कार्य करीत. १९४२ साली व्हाईसरॉयच्या इक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये त्यांची मजूरमंत्री म्हणून नियुक्त झाल्यावर ते दिल्लीला गेले. डॉ. बाबासाहेबांच्या मुंबईतील वास्तव्या अभावी राजगृह आणि त्यांतील ग्रंथालय सुनेसुने वाटे. अधूनमधून ते मुंबईस येत. परत जाताना अनेक ग्रंथ आपल्या ग्रंथालयातून दिल्लीला नेत. तसेच दिल्लीतील पुस्तकांच्या दुकानातून नवीन नवीन ग्रंथ विकत घेण्याचा उपक्रम चालूच होता. त्यामुळे अनेक नवीन ग्रंथांची भर दिल्लीतील ग्रंथालयात पडत होती. १९४६ साली डॉ. बाबासाहेबांची घटना समितीवर निवड झाल्यानंतर मुंबईच्या ग्रंथालयातून त्यांनी सुमारे दोन हजार ग्रंथ दिल्लीला नेले. दिल्लीतील दहा वर्षांच्या वास्तव्यात तेथेही त्यांचे नवीन ग्रंथालय निर्माण झाले. या ग्रंथालयातून सुमारे दहा हजार ग्रंथांचा संग्रह झाला होता.

डॉ. बाबासाहेबांच्या अनेक सहकाऱ्यांनी त्यांना आग्रहपूर्वक विनंती केल्यामुळे आपला आवडता मौलिक ग्रंथसंग्रह त्यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सिद्धार्थ महाविद्यालयाला मोठ्या औदार्याने दिला. त्यावेळी डॉ. बाबासाहेब म्हणाले, 'माझ्या जीवनातील स्नेहीसोबती मी तुम्हाला देत आहे. समाजाने बहिष्कृत केलेल्या माझ्यासारख्याला या थोर ग्रंथांनीच जवळ केले. मला जगात त्यांच्याइतका परमस्नेही दुसरा नाही. म्हणूनच एकही पुस्तक दुसऱ्याला देणे माझ्या जीवावर येते.' त्यांच्या या उद्गारावरून त्यांचे ग्रंथावरील प्रेम, श्रद्धा यांची प्रचिती येते.

आपल्या ग्रंथालयासंबंधी मित्रमंडळींशी चर्चा करताना एकदा डॉ. बाबासाहेब म्हणाले होते की, माझे आर्थिक कितीही नुकसान झाले तरी मला त्याबद्दल काहीच वाईट वाटणार नाही, परंतु माझ्या दुर्मिळ व अमूल्य अशा ग्रंथालयाला काही धोका होण्याचा प्रसंग आला तर मला सहन होणार नाही. या ग्रंथांवर माझे प्राणापेक्षा अधिक प्रेम आहे.

भारतातील काही थोर लोकांनी डॉ. बाबासाहेबांचा हा बहुमोल ग्रंथसंग्रह योग्य मोल देऊन घेण्याची इच्छा प्रगट केली होती. त्यापैकी श्री. मदनमोहन मालवीय हा ग्रंथसंग्रह दोन लाख रुपयांस विकत घेऊन बनारस विद्यापीठाला देण्यास तयार होते तर बिर्ला शेटजी सारख्या कोट्याधीशाने पिलानी विद्यापीठासाठी सहा लक्ष रुपयात हा ग्रंथसंग्रह विकत घेण्याची तयारी दाखविली. पण डॉ. बाबासाहेबांनी त्याला नकार दिला व हा ग्रंथसंग्रह पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या 'सिद्धार्थ महाविद्यालया'ला दिला.

डॉ. बाबासाहेबांनी आयुष्याची ४०/४५ वर्षे ज्ञानसाधनेत घालवून आपल्या ज्ञानमंदिरातील मौलिक ग्रंथातील विचारधन आत्मसात केले. अविरत ज्ञानसाधनेतून प्राप्त झालेल्या दिव्य दृष्टीने त्यांनी जे लेखन केले व अप्रतिम ग्रंथ लिहिले ते अति पुरोगामी व वास्तववादी आहेत. त्यांच्या विषयाची मांडणी तर्कशुद्ध व सडेतोड आढळते. लेखनातून अनेक पौर्वात्य व पाश्चिमात्य विचारवंतांचे उतारे, अवतरणे, मौलिक विचार व सबळ पुरावे देऊन ते आपल्या विचारांची भूमिका स्पष्ट करीत.

डॉ. बाबासाहेबांनी अनेक ग्रंथांचे लेखन केले. त्यातून दलितोन्नति व राष्ट्रोन्नतीच्या दृष्टीने आत्मीयतेने महत्त्वपूर्ण विचार प्रकट केलेले दिसतात. समाजकारण, राजकारण, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र इत्यादींवर जे विचार प्रकट केलेले आहेत ते मौलिक व स्वतंत्र असेच आहेत. त्यातून त्यांच्या कर्तृत्वाचे, तेजस्वी व्यक्तिमत्वाचे रहस्य म्हणजे त्यांची अविरत ज्ञानोपासना. त्या ज्ञान उपासनेचे पवित्र स्थान म्हणजे त्यांचे ज्ञानमंदिर. राजगृहातील मौलिक ग्रंथालय !!!

- ग्रंथमित्र



# लेखक नाम सूची

*मुंबई मराठी साहित्य संघ ही मुंबईतील जुनी व महत्त्वपूर्ण साहित्य संस्था. या संस्थेच्या ग्रंथालयात गतवर्षी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालय शास्त्राच्या माजी विद्यार्थिनींनी काही महिने कंत्राटी पद्धतीने विशिष्ट काम केले. या दरम्यान या संस्थेचा नाट्य क्षेत्रातील लौकिक व योगदान लक्षात घेता या संस्थेच्या ग्रंथालयात असणाऱ्या नाटकांच्या संहितांची सूची या विद्यार्थिनींनी केली. ही सूची 'दिशा' मधून, संदर्भासाठी उपलब्ध व्हावी, या हेतूने देत आहोत. सूची करणाऱ्या विद्यार्थिनी सौ. छाया मोहिते व पल्लवी तडस या होत. (शै. वर्ष १९९९-२०००)*

*- संपादक*

| क्र. | लेखक | नाटक | साल |
|---|---|---|---|
| ३३३ | धारगळकर, ना. र. | सख्खे भाऊ पक्के वैरी | १९६२ |
| ३३४ | नरवणे, कविता | नेपोलियन | १९७० |
| ३३५ | नवरे, शं. ना. | एक असतो राजा | १९६३ |
| ३३६ | नवरे, शं. ना. | सुरुंग | १९७३ |
| ३३७ | नवरे, शं. ना. | नवरा म्हणू नये आपला | १९६४ |
| ३३८ | नवरे, शं. ना. | गुंतता हृदय हे | १९७४ |
| ३३९ | नवरे, शं. ना. | सूर राहू दे | १९७३ |
| ३४० | नवरे, शं. ना. | धुक्यात हरवली वाट | १९७३ |
| ३४१ | नाईक, गुरुनाथ | रिपाजी राणा | १९६६ |
| ३४२ | नाथमाधव | जातिवंत मराठा वीर | १९५४ |
| ३४३ | निरंतर, गं. भा. | नमस्कार बाबुराव हे साष्टांग नमस्कार | १९४८ |
| ३४४ | नेवाळकर, दा. वि. | धर्मरहस्य | १९०९ |
| ३४५ | नेवाळकर, दा. वि. | (सं) तारक-मारक | - |
| ३४६ | नेवाळकर, दा. वि. | विकल्प विमोचन | १९०८ |
| ३४७ | नेवाळकर, दा. वि. | (सं) दंडधारी | १९०९ |
| ३४८ | नेवाळकर, दा. वि. | (सं) प्रेमगुंफा | १९०८ |
| ३४९ | नेवाळकर, दा. वि. | (सं) मनोविजय | १९२६ |
| ३५० | नेवाळकर, दा. वि. | (सं) समानशासन | १९१० |
| ३५१ | नेवाळकर, दा. वि. | कट्टाकर्मयोगी | - |
| ३५२ | पटवर्धन, गो. वि. | (सं) वनविहार अर्थात | १९२५ |
| ३५३ | पटकी, सविता | खून पहावा करून | १९६४ |
| ३५४ | परचुरे, ज. पां | जातिवंत जवान | १९३६ |
| ३५५ | पराडकर, ल. वि. | संशय निरसन | १९१२ |
| ३५६ | पराडकर, ना. बा. | कल्याण खजिना | १९५१ |
| ३५६ | परांजपे | पांघरलेली कावडी | १९४२ |
| ३५७ | परांजपे, अशोक | आतून किर्तन वरून तमाशा | १९७४ |
| ३५८ | परांजपे, के. प. | सांगते ऐका | १९६१ |
| ३५९ | परांजपे, शि. म. | भीमराव | |
| ३६० | परांजपे, शि. म. | रामदेवराव | |
| ३६१ | परांजपे, शि. म. | कादंबरी | १८९७ |
| ३६२ | परांजपे, शि. म. | पहिला पांडव | १९३१ |
| ३६३ | परांजपे, सई | सळो की पळो | १९६६ |
| ३६४ | पेटकर, भा. वि. | (सं) कुंजविहारी | १९२५ |
| ३६५ | पवार, ग. ना. | कविराय रामजोशी | १९५२ |
| ३६६ | पवार, रमेश | गुरु | १९७४ |
| ३६७ | पवार, शरदचंद्र | राष्ट्रवीर | १९३८ |
| ३६८ | पवार, बबन | चोरावर मोर | १९६० |
| ३६९ | प्रभु, बबन | माकड आणि पाचर | १९६० |
| ३७० | प्रभु, बबन | झोपी गेलेला जागा झाला | १९७३ |
| ३७१ | प्रभु, बबन | दिनूच्या सासूबाई राधाबाई | १९७१ |
| ३७२ | प्रभु, बबन | पळा पळा कोण पुढे पळे तो | १९७४ |
| ३७३ | प्रभु, सी. गो. | आग्र्याहून सुटका | १९६० |
| ३७४ | पाटकर, शं. आ. | विकल्प विमोचन | १९०८ |
| ३७५ | पाटणकर, मा. ना. | विक्रम शशिकला | १८९४ |
| ३७६ | पाटील, के. डी. | रंगलो रंगेल्या रंगमहाली | १९६८ |
| ३७७ | पाटील, शं. | लवंगी मिरची कोल्हापूरची | १९६१ |
| ३७८ | पाटील, वसुधा | चियानो | १९७४ |

| क्र. | लेखक | नाटक | साल |
|---|---|---|---|
| ३७९ | पाठारे, आ. मो. | मृगाभास | १९१२ |
| ३८० | पाठारे, आ. मो. | राधाराधन | १९४२ |
| ३८१ | पाठारे, वि. आ. | भक्त भानुदास | १९४४ |
| ३८२ | पाठारे, वि. आ. | (सं) कलावंतीण | १९३७ |
| ३८३ | पारडकर, ना. वा. | घरंदाज | १९४० |
| ३८४ | पाध्ये, भाऊ | ऑपरेशन छक्का | १९६९ |
| ३८५ | पारकर, प्र. | स्वामी तिन्ही जागाचा | १९७१ |
| ३८६ | प्रिलोककर, ग. सो. | हुंडा | १९०४ |
| ३८७ | पुरंदरे, भा. नी. | (सं)संसाराच्या गाड्या | १९६८ |
| ३८८ | पुरंदरे, भा. नी. | कळतं पण वळतं कुठं? | १९७१ |
| ३८९ | पुंडलीक, विद्याधर | चक्र | १९६६ |
| ३९० | पुंडलीक, वि. | माता द्रौपदी | १९७२ |
| ३९१ | पूर्वदेशी, गुलाबसिंह | (सं) प्रेमबंधन | १९०९ |
| ३९२ | पेडणेकर, हिराबाई | दामिनी | १९१२ |
| ३९३ | पेंडसे, श्री. ना. | महापूर | १९६१ |
| ३९४ | पेंडसे, श्री. ना. | राजे मास्तर | १९६४ |
| ३९५ | पेंडसे, श्री. ना. | गारंबीचा बापू | १९६८ |
| ३९६ | पेंडसे, श्री. ना. | संभूसांच्या चाळीत | १९६८ |
| ३९७ | पेंडसे, श्री. ना. | यशोदा | १९६५ |
| ३९८ | पै, शिरिष | सोन्याची खाण | १९६७ |
| ३९९ | फडके, ना. सी. | युगांतर | १९३० |
| ४०० | फडके, ना. सी. | काळे गोरे | १९४५ |
| ४०१ | फडके, ना. सी. | संजीवन | १९३४ |
| ४०२ | फडके, शाम | ही चौकट वाटोळी | १९६८ |
| ४०३ | फडके, शाम | एक होता औरंगजेब | १९६५ |
| ४०४ | फडके, शाम | नदी शेवटी सागराला मिळाली | १९६८ |
| ४०५ | फडके, शाम | राजा नावाचा गुलाम | १९६७ |
| ४०६ | फाटक, गणेशशास्त्री | उषा स्वयंवर म्हणजेच वीरशृंगार | १९५४ |
| ४०७ | फाटक, ना. | हॅम्लेट | १९६२ |
| ४०८ | बर्गे, रा. सु. | मधुमिलन | १९५५ |
| ४०९ | बर्वे, अ. वा. | (सं) सुदाम | - |
| ४१० | बर्वे, अ. वा. | (सं) गोपीचंद | १९०४ |
| ४११ | बर्वे, अ. वा. | समजुतीचा घोटाळा | - |
| ४१२ | बर्वे, अ. वा. | सैतान | १९१८ |
| ४१३ | बर्वे, स. पां. | पुर्नजन्म | १९६८ |
| ४१४ | बर्वे, स. पां. | प्रणयी-किटक | १९६३ |
| ४१५ | बर्वे, स.पां. | योगसंसार | १९५४ |
| ४१६ | बर्वे, स. पां. | जळता गोमांतक | १९५५ |
| ४१७ | ब्रम्हेम, मो. द. | आघात | १९४४ |
| ४१८ | बापट, शी. म. | चिखलातलं कमळ | १९५६ |
| ४१९ | बेलसर, खं. भि. | पंचम हेन्री चरित्र | १९११ |
| ४२० | बेडेकर, वि. | मूल आणि मूल | - |
| ४२१ | बेडेकर, विश्राम | नगो वा कुंजगो वा | १९६१ |
| ४२२ | बेडेकर, विश्राम | वाजे पाऊल आपुले | १९६७ |
| ४२३ | बेहेरे, ना. के. | भिकारी | १९२५ |
| ४२४ | भट, गो. के. | परक्याचे धन | १९५४ |
| ४२५ | भगत, व. सू. | जंगली कबूतर | १९७४ |
| ४२६ | भाटे, गो. चि. | विचार विलसित | १९१२ |
| ४२७ | भावे, पु. भा. | स्वामिनी | - |
| ४२८ | भावे, ल. ना. | पठ्ठे बापुराव | १९६१ |
| ४२९ | भिडे, वा. बा. | (सं) नलनाच्या दमयंती | १९६८ |
| ४३० | भिलवडीकर, वि. द. | नरवीर मालुसरे | १९०९ |
| ४३१ | भुसारी जयकुमार | कणसा कणसा दाणा दे | १९६७ |
| ४३२ | भोसले, कृ. बा. | संकल्प | १९६२ |
| ४३३ | भोळे, ज्योत्स्ना | आराधना | १९६० |
| ४३४ | मडकईकर, ज. ग. | महत्वाकांक्षेचा परिणाम | १९६३ |
| ४३५ | मडकईकर, ज. गो. | शृंखला | १९६५ |
| ४३६ | मर्ढेकर, बा. सी. | नटेश्वर | १९६५ |
| ४३७ | मतकरी, रत्नाकर | मधु मंजरी | १९५९ |
| ४३८ | मतकरी, रत्नाकर | एकाच मातीची खेळणी | १९६२ |
| ४३९ | मतकरी, रत्नाकर | कळलाव्या कांद्याची कहाणी | १९६० |
| ४४० | मतकरी, रत्नाकर | प्रेमकहाणी | १९७३ |
| ४४१ | मतकरी, रत्नाकर | ब्रह्महत्या | १९६७ |
| ४४२ | मतकरी, रत्नाकर | विन्हाड बाजले | १९७२ |
| ४४३ | मराठे, चिं. य. | होनाजी बाळा | १९५४ |
| ४४४ | मराठे, चिं. य. | लोकांचा राजा | १९५६ |
| ४४५ | मराठे, ना. द. | उदयाचा महाराष्ट्र | - |
| ४४६ | मनोहर, माधव | आबासाहेबांच्या मुली | १९४३ |
| ४४७ | महाजने, ह. ग. | शकुंतला | १९५९ |

| क्र. | लेखक | नाटक | साल |
|---|---|---|---|
| ४४८ | महाजने, ह. रा. | रविवारची चिंतनिका | १९६७ |
| ४४९ | महाजनी, वि. मो. | तारा | १९०९ |
| ४५० | माडगूळकर, व्यं. | सती | १९६८ |
| ४५१ | मातंकर, सुं. भु. | नवे जग | १९५५ |
| ४५२ | मायदेव, वा. गो. | सॉक्रेटीस | १९६४ |
| ४५३ | माळगावकर, शि.न. | नूतन शिलेदारी | १९२८ |
| ४५४ | मित्रा, शंभु | कांचनरंग | १९६८ |
| ४५५ | मिरासदार, द. मा. | गाणारा मुलुख | १९७१ |
| ४५६ | मोडक, वि. वि. | प्रणय विवाह | १९०२ |
| ४५७ | मोये, कृ. ल. | आपल्या पायांचा प्रसाद | १९५८ |
| ४५८ | मोये, कृ. ल. | दुधात साखर | १९६० |
| ४५९ | रांगणेकर, मो. ग. | जयजयकार | १९५३ |
| ४६० | रांगणेकर, मो. ग. | आशीर्वाद | १९४७ |
| ४६१ | रांगणेकर, मो. ग. | लिलाव | १९५५ |
| ४६२ | रांगणेकर, मो. ग. | माझे घर | १९६४ |
| ४६३ | रांगणेकर, मो. ग. | भटाला दिली ओसरी | १९५६ |
| ४६४ | रांगणेकर, मो. ग. | वहिनी | १९६६ |
| ४६५ | रांगणेकर, मो. ग. | एक होता म्हातारा | १९४८ |
| ४६६ | रांगणेकर, मो. ग. | भाग्योदय | १९५७ |
| ४६७ | रांगणेकर, मो. ग. | हे ही दिवस जातील | १९६१ |
| ४६८ | रांगणेकर, मो. ग. | हिमालयाची सावली | १९६२ |
| ४६९ | रांगणेकर, मो. ग. | पतित एकदा पतित का सदा? | १९६५ |
| ४७० | रांगणेकर, मो. ग. | कोणे एके काळी | १९५० |
| ४७१ | रांगणेकर, मो. ग. | माहेर | १९५१ |
| ४७२ | रांगणेकर, मो. ग. | रंभा | १९६५ |
| ४७३ | रांगणेकर, मो. ग. | कुलवधु | १९४२ |
| ४७४ | राजकुमार | संभावित | १९४१ |
| ४७५ | राजमकर, यशवन्त | नकटीच्या लग्नाला | १९७३ |
| ४७६ | राजमकर, यशवन्त | शतानीक | १९६६ |
| ४७७ | राजमकर, यशवन्त | जिद्द | १९६३ |
| ४७८ | राजवाडे, कृ. शा. | मुद्राराक्षक | १९०६ |
| ४७९ | राणे, बाबाजी, टी. | श्री. पुंडलीक | १९०९ |
| ४८० | रानडे, श्री. वा. | कुंपणावरून | १९४७ |
| ४८१ | राव, र. टी. | संध्याविलास | १९६२ |
| ४८२ | रेगे, सदानंद | जयकेतु | १९५९ |

| क्र. | लेखक | नाटक | साल |
|---|---|---|---|
| ४८३ | रेळे, अ. प. | रंगरागिणी | १९५६ |
| ४८४ | लाड, भा. का. | सौभाग्यवती विधवा | - |
| ४८५ | लिमये, व. र. | चंपा किंवा नरगुंदकर व टिपू सुलतान यांची लढाई | १८३१ |
| ४८६ | लिमये, वा. वा. | अगा जे घडलेची नाही | १९६५ |
| ४८७ | लिमये, पा. गं. | धनूगडच्या चिलोटी शिवा | १९०५ |
| ४८८ | लोंढे, मो. ग. | गोदावरी अथवा दुर्दैवी सून | १८९० |
| ४८९ | वकील, व्यं. शं. | नव्या ज्योती | १९३९ |
| ४९० | वकील, व्यं. शठ. | स्वर्गावर स्वारी | १९२८ |
| ४९१ | वकील, व्यं. शं. | जळती घरं | १९४२ |
| ४९२ | वकील, व्यंकटेश | गाव काकू | १९५१ |
| ४९३ | वझे, शं. कृ. | प्रमतमोहिनी | १९२२ |
| ४९४ | वनविहार | वहिर्जी नाईक | १९४५ |
| ४९५ | वरेरकर, भा. वि. | सत्तेचे गुलाम | १९२२ |
| ४९६ | वरेरकर, भा. वि. | सन्यासाचा संसार | १९१९ |
| ४९७ | वरेरकर, भा. वि. | करीन ती पूर्व | १९६४ |
| ४९८ | वरेरकर, मामा | सारस्वत | १९७२ |
| ४९९ | वरेरकर, मामा | लयाचा लय | १९६० |
| ५०० | वरेरकर, भा. वि. | तुरुंगाच्या दारात | १९२३ |
| ५०१ | वरेरकर, भा. वि. | पतितपावन | १९३१ |
| ५०२ | वरेरकर, भा. वि. | हात मुलाचा बाप | १९२१ |
| ५०३ | वरेरकर, भा. वि. | कडक लक्ष्मी | १९४४ |
| ५०४ | वरेरकर, भा. वि. | भूमिकन्या सीता | १९६२ |
| ५०५ | वरेरकर, भा. वि. | जीवा शिवाजी भेट | १९५० |
| ५०६ | वरेरकर, भा. वि. | कुंजविहारी | १९२४ |
| ५०७ | वरेरकर, भा. वि. | सोन्याचा कळस | १९६१ |
| ५०८ | वरेरकर, भा. वि. | संसार | १९३४ |
| ५०९ | वरेरकर, भा. वि. | माझ्या कलेसाठी | १९४२ |
| ५१० | वरेरकर, भा. वि. | पापी पुण्य | १९३० |
| ५११ | वरेरकर, भा. वि. | जागती ज्योत | १९३३ |
| ५१२ | वरेरकर, भा. वि. | न मागता | १९४४ |
| ५१३ | वरेरकर, भा. वि. | संन्यासाचे लग्न | १९६२ |
| ५१४ | वर्तक, वा. प्र. | (सं) तापसी शारदा | १९११ |
| ५१५ | वाटकर, ना. | सोळा शिपमार | १९६८ |
| ५१६ | वऱ्हाडकर, शरद | दोन घडीचा डाव | १९६१ |

| क्र. | लेखक | नाटक | साल |
|---|---|---|---|
| ५१७ | वर्टी, अ. वा. | रागिनी बाग | १९५० |
| ५१८ | वाड, वि. ना. | (सं) शिवप्रसाद | १९२१ |
| ५१९ | वाघ, ग. व्य. | विझली वात | १९३९ |
| ५२० | वाईकर, रामचंद्रानंद | आत्मविश्वास | - |
| ५२१ | विश्वेश्वर | मेलेल्या नाटककारांचे जीवन नाटक | १९३१ |
| ५२२ | वेलणकर, पा. अ. | मायेच्या मुली | १९४५ |
| ५२३ | वेलणकर, पा. अ. | (सं) कन्याविहार | १९४१ |
| ५२४ | वेलणकर, पा. अ. | (सं) साक्या संसार | १९३९ |
| ५२५ | वेंगुर्लेकर | तोंनी आवडे देवाला | १९६३ |
| ५२६ | वैद्य, चिं. वि. | संयोगिता अर्थात पतिनिष्ठा | १९३४ |
| ५२७ | वैद्य, ना. आ. | (सं) वैरसमन | १९३४ |
| ५२८ | शशांक | शशिकला | १९३४ |
| ५२९ | शिरगोपीकर, ना. | शाबास विठ्ठल शाबास | १९७१ |
| ५३० | शिरगोपीकर, गो. रा | (सं) बालक्रिडा | १९२६ |
| ५३१ | शिरवळकर, वा. र. | श्री तुकाराम | १९२८ |
| ५३२ | शिरवळकर, वा. र. | राणा भिमदेव अथवा खरा राजपूत | १९०८ |
| ५३३ | शिरवाडकर, वि. वा. | ऑथेल्लो | १९६१ |
| ५३४ | शिरवाडकर, वि. वा. | देवाचे घर | १९४६ |
| ५३५ | शिरवाडकर, वि. वा. | दुसरा पेशवा | १९४७ |
| ५३६ | शिरवाडकर, वि. वा. | राजमुकुट | १९५४ |
| ५३७ | शिरवाडकर, वि. वा. | दुरचे दिवे | १९४६ |
| ५३८ | शिरवाडकर, वि. वा. | विज म्हणाली धरतीला | १९७० |
| ५३९ | शिरवाडकर, वि. वा. | वैजयंती | १९६० |
| ५४० | शिरवाडकर, वि. वा. | विदूषक | १९७३ |
| ५४१ | शिवलकर, मुरारी | गहिवरला शिवराया | १९६६ |
| ५४२ | शिवलकर, मु. गो. | हे विश्वची माझे घर | १९६१ |
| ५४३ | शिंदे, र. भा. | मराठ्यांचा मनसबदार | १९४९ |
| ५४४ | शिंदे, राजाराम | कांचनगंगा | १९६० |
| ५४५ | शिंदे, मा. कृ. | गृहलक्ष्मी | १९३४ |
| ५४६ | शिंदे, मा. कृ. | आंदोलन | १९४८ |
| ५४७ | शुल्क, स. अ. | साध्वी मिराबाई | १९३० |
| ५४८ | शुल्क, स. अ. | सिंहाचा छावा | १९३२ |
| ५४९ | शुल्क, स. अ. | सौभाग्यलक्ष्मी | १९२६ |
| ५५० | शुल्क, स. अ. | शिकलेले शहाणे | १९६२ |
| ५५१ | शेख, अमर | पहिला बळी | १९५१ |
| ५५२ | शेट्ये, वि. गो. | रामहीम | १९२४ |
| ५५३ | शेट्ये, वि. गो. | रक्षाबंधन | १९२९ |
| ५५४ | शेणवी | पतितोद्धार | १९३० |
| ५५५ | सबनीस, वसंत | चिलखतराव जगन्नाथ | १९७२ |
| ५५६ | सबनीस, वसंत | अट्पाट सुतार, पावशेर न्हावी सव्वाशेर शिंपी | १९६१ |
| ५५७ | सबनीस, शं. आ. | श्री हर्षविरचित रत्नावली | - |
| ५५८ | सबनीस वसंत | विच्छा माझी पुरी करा | १९६६ |
| ५५९ | समर्थ, न. ना. | वळलं तर सुत | १९६३ |
| ५६० | समर्थ, न. ना. | पाहुणे | १९५२ |
| ५६१ | सरकार, बादल | बाकी इतिहास | १९७३ |
| ५६२ | सरपोतदार, न. दा. | बाजीरावाचा बेटा | १९३७ |
| ५६३ | सहस्रबुद्धे, उमाबाई | (सं) काहूर | १९४८ |
| ५६४ | सहस्रबुद्धे, प. त्रिं | हवन | १९४३ |
| ५६५ | साठे, शं. गो. | छापील संसार | १९३८ |
| ५६६ | सातारकर, मधुकर | पण लक्षात कोण घेतो? | १९६४ |
| ५६७ | साबळे, शाहीर | ग्यानबाची मेख | १९६३ |
| ५६८ | साबळे, शाहीर | आंधळं दळतय | १९६७ |
| ५६९ | साबळे, शाहीर | रामराज्यात एक रात्र | १९६४ |
| ५७० | सारोळकर, द. ग. | (सं) जनता जनार्दन | १९२६ |
| ५७१ | सावरकर, वि. दा. | उत्तरक्रिया | १९३३ |
| ५७२ | सावंत, आत्माराम | राजकारण गेलं चुलीत | १९७२ |
| ५७३ | सुर्वे, प. ग. | हलवायाच्या घरावर | १९६४ |
| ५७४ | सुर्वे, प. ग. | वॉर्ड नं. १२ कॉट नं. १३ | १९६४ |
| ५७५ | सुळे, ल. ग. | (सं) लग्नसोहळा | १९३३ |
| ५७६ | सोकर, बा. श्री. | हरिश्चंद्र | १८७२-१८८० |
| ५७७ | सोनार, बा. रा. | ये रे घना ! | १९७३ |
| ५७८ | हंबर्डे, वि. ग. | सन १८५७ | १९३९ |
| ५७९ | होमणे, राजाराम | प्रीति परी तुजवरती | १९७१ |
| ५८० | क्षेत्रमाडे, सुमती | मीच पहाते माझी मृगया | १९६७ |

(समाप्त)

# परिसर वार्ता

## तंत्रनिकेतन वार्ता - अभिनंदन

१३ मार्च रोजी मराठी ग्रंथ संग्रहालयाचा वार्षिकोत्सव ठाणे येथे पार पडला. यावेळी समारंभाचे अध्यक्ष श्री. शं. ना. नवरे हे होते. ग्रंथालयाच्या सेवाभावी सेवकांचाही यावेळी त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सेवकांमध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील ग्रंथालय परिचर श्री. रमेश पाटील हे होते. याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे.



श्री. रमेश दौलत पाटील

विद्या प्रसारक मंडळाने नव्यानेच सुरू केलेल्या मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाचे व 'आय.पी.आर. इंडस्ट्रीयल कन्सलटन्सी सेल'चे उद्घाटन दीप प्रज्वलनाने दिनांक २५ एप्रिल २००३ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाले. सदर अभ्यासक्रम विद्या प्रसारक मंडळाच्या प्रगत अभ्यास केंद्रातर्फे चालविला जाणार आहे.

या उद्घाटन समारंभाची सुरुवात प्रा. कीर्ती आगाशे व ऋचा आगाशे यांनी सादर केलेल्या ईशस्तवनाने झाली. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर व्यासपीठावर उपस्थित होते. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. केळकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

या नंतर डॉ. मोहन नायर, श्रीमती स्वाती पिरामल, पेटंट व डिझाइन चे असिस्टंट कमिशनर श्री. एस्. जे. वैद्य, डॉ. प्रबुद्ध गांगुली या आयपीआरमधील विषय तज्ज्ञांनी 'पॉवर पॉईंट'च्या आधारे या विषयाचे वाढते महत्त्व, या विषयाचे इतर उपविषय या संबंधाने बहुमोल मार्गदर्शन केले. अशा प्रकारचा विशेष अभ्यासक्रम योजणारी संस्थात आहे.

या कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री.बि.करंदीकर, कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले, श्री. दिलीप जोशी, प्रगत अभ्यास केंद्राचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जी. व्ही. कुलकर्णी, कला-वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य सा. वा. गोखले, विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील, तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सी. श्री. मुजुमदार, या शिक्षणसंस्थांमधील प्राध्यापक व आमंत्रित मान्यवर उपस्थित होते.

## प्रा. सौ. तांबे यांना निरोप

'महाविद्यालयात आपण दिवसाचा सर्वात चांगला वेळ व्यतीत करतो. या काळात आपणही समृद्ध होत असतो.' असे उद्गार बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील फाऊंडेशन कोर्स या विषयाच्या प्राध्यापिका सौ. उषा तांबे यांनी २८ एप्रिल रोजी सायंकाळी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात बोलताना काढले.

महाविद्यालयातील प्राध्यापक मंचातर्फे स्वेच्छा निवृत्ती घेतल्याबद्दल सौ. उषा तांबे यांना निरोप देण्यासाठी सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी प्रा. सौ. जोगळेकर, प्रा. सौ. उषा बाळ व प्रा. मोहन पाठक यांनी सौ. उषा तांबे यांच्या संदर्भातील आठवणींना उजाळा देणारी मनोगते व्यक्त केली. पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित यांनीही आठवणींना उजाळा दिला. 'मिलिंद व पद्मिनीची 'आई आज रिटायर होते आहे.' असे सांगून प्राचार्य सी. जी. पाटील यांनी प्रा. सौ. तांबे व श्री. शशिकांत तांबे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी उच्च माध्यमिक मंडळाच्या अभ्यासक्रम समितीवर नेमणूक झाल्याबद्दल डॉ. नागेश टेकाळे यांचा

गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक मंचाचे प्रमुख प्रा. अशोक पाटील यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. सुदेश राठोड यांनी केले. कार्यक्रमास पदवी व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

## जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या 'युवाशिल्प' विशेषांकाचे प्रकाशन

विद्यार्थीदशेत असताना १९७७-७८ साली जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या त्यावेळच्या वार्षिकांकाने मला लिहिते केले. वार्षिकांकाचा विद्यार्थी संपादक म्हणूनही मी काम केले. या अंकातील साहित्याच्या संगतीनेच माझ्यातील हा विद्यार्थी मोठा झाला आणि हा हात लिहिता झाला. हेच 'युवाशिल्प'च्या अंकाचे श्रेय आहे, असे भावपूर्ण उद्गार कविवर्य प्रा. प्रवीण दवणे यांनी 'युवाशिल्प



**'युवाशिल्प' विशेषांकाचे प्रकाशन करताना कवीवर्य प्रवीण दवणे, मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, प्राचार्य स. वा. गोखले,**

विशेषांक २००२-२००३' चे प्रकाशन करतांना काढले.

महाविद्यालयाच्या अध्यापक कक्षात झालेल्या या कार्यक्रमात व्यासपीठावर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. कांदीकर, प्राचार्य स. वा. गोखले, उपप्राचार्य अशोक बडगुजर, उपप्राचार्या शोभा दोशी, कनिष्ठ महाविद्यालय पर्यवेक्षिका अनघा देशपांडे, युवाशिल्पचे मुख्य संपादक अनिल भावड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रवीण दवणे पुढे म्हणाले की, 'महाविद्यालयीन जीवनातील काळ आज हरवला असला तरी युवाशिल्पच्या प्रकाशनाच्या निमित्ताने ते क्षण पुन्हा जिवंत होत आहेत आणि महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना पुन्हा नव्याने उजाळा मिळाला. त्यावेळी एक विद्यार्थी म्हणून 'मराठी साहित्य संमेलनाने मला काय दिले?' हा लेख वार्षिकांकात मी पहिल्यांदा लिहिला. ते साहित्य संमेलन मी अक्षरश: जगलो. अनेक मोठमोठे साहित्यिक त्यावेळी प्रथमच जवळून पाहिले. नंतर त्यातील काहीशी विशेषत: माधव मनोहर, गंगाधर गाडगीळ यांच्याशी अत्यंत जवळचे संबंध निर्माण झाले. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्याबरोबरच 'गारंबीचा बापू' ही कादंबरी शिकवण्याचे भाग्य मला लाभले. आठवणीच्या संमेलनात महाविद्यालयीन सुखद आठवणी रुजत असतात. त्या आठवणींसह जगताना साहित्याच्या गोडीतूनच श्रद्धेचा ओलसरपणा हीच साहित्यकला माणसाला प्रेरणा देते, असे सांगून 'युवाशिल्प'च्या अंकाला आणि त्यात लेखन करणाऱ्या विद्यार्थी लेखकांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा त्यांनी दिल्या.

डॉ. वा. ना. बेडेकर यांनी या महाविद्यालयाने आजवर अनेक युवाशिल्पे घडवली. त्यातलेच एक दर्जेदार युवाशिल्प म्हणजे कवी प्रवीण दवणे होय, असे गौरवोद्गार काढले. संपादनामुळे माणूस आणखी संस्कारित होत जातो असे सांगून त्यांनी संपादक मंडळाने एक अतिशय दर्जेदार, देखणा आणि उपयुक्त वार्षिकांक तयार केल्याबद्दल अभिनंदन केले.

प्राचार्य गोखले म्हणाले की, नवनिर्मितीत माणसाला खरा आनंद मिळतो. त्यामुळे युवाशिल्पच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलेबरोबरच भावनाविष्कारालाही वाव मिळत आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्य संपादक प्रा. अनिल भावड यांनी उपस्थितांना विशेषांकाविषयी तपशीलवार माहिती

दिली. महाविद्यालयांत वरिष्ठ लिपिक प्रकाश शेंबेकर यांना 'शिक्षकेतर कर्मचारी भूषण' पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. बेडेकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. युवाशिल्प विशेषांकात ५० लेख असून त्यावर राष्ट्रीय गिरी वर्षाला साजेसे व आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्तींच्या वर्षानिमित्त समर्पक असे मुखपृष्ठ सजले आहे. प्राचार्य स. बा. गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य संपादक प्रा. अनिल भावड यांच्या नेतृत्वाखाली प्रा. सुचित्रा नाईक, प्रा. गौरी तिरमारे, प्रा. अनिल ढवळे, विद्यार्थी संपादक कु. हर्षदा पाटील या संपादक मंडळाने हा माहितीपूर्ण व उपयुक्त अंक तयार केला आहे. प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. गौरी तिरमारे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय, प्रा. सुचित्रा नाईक आणि आभार प्रा. अनिल ढवळे यांनी मानले.

सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या सोहळ्याची सांगता तृप्ती गोखले हिने गायलेल्या पसायदानाने झाली.

## *बांदोडकर विज्ञान महाविद्यालय निकाल*

### मार्च-एप्रिलमध्ये महाविद्यालयात झालेल्या परीक्षांचे निकाल पुढीलप्रमाणे

#### वर्ग - एफ.वाय.जे.सी.

| | |
|---|---|
| एकूण विद्यार्थी | - ४४७ |
| उत्तीर्ण | - ३८९ |
| टक्केवारी | - ८७.०२ |
| विशेष प्राविण्य | - २५ |
| प्रथम श्रेणी | - १४८ |
| द्वितीय श्रेणी | - १५५ |
| उत्तीर्ण श्रेणी | - ६१ |
| अनुत्तीर्ण | - ५८ |

प्रथम क्रमांक : गौरवी पवार ८४.८३%

द्वितीय क्रमांक : स्नेहल फाटक ८४.१६%

तृतीय क्रमांक : समीर तळवडेकर

#### विषयात प्रथम

| | | |
|---|---|---|
| मराठी | : अमृता कुलकर्णी | ८० गुण |
| हिंदी | : स्नेहल फाटक | ७२ गुण |
| इंग्रजी | : गौरवी पवार | ८० गुण |
| गणित | : मयुर गुरव | ८३ गुण |
| पदार्थविज्ञान | : श्वेता कामथ | ८९ गुण |
| जीवशास्त्र | : स्नेहल फाटक | ९४ गुण |
| रसायनशास्त्र | : मानस ओगुरी | ९६ गुण |

#### एफ. वाय. बी.एस्.सी.

| | |
|---|---|
| एकूण विद्यार्थी | - ३३० |
| उत्तीर्ण | - २२२ |
| एटीकेटीसह उत्तीर्ण | - ३२ |
| अनुत्तीर्ण | - ७४ |
| राखीव निकाल | - २ |
| टक्केवारी- | ६७.२७ (एटीकेटी शिवाय) |

प्रथम क्रमांक : प्रणाली गावकर (५७१ गुण)

द्वितीय क्रमांक : ताझीन काझी (५६३ गुण)

तृतीय क्रमांक: सैय्यद सॅनोबारझीरा एस. अब्बास (५५०गुण)

#### विषयात प्रथम

| | |
|---|---|
| रसायन शास्त्र | : कांचन गुप्ता |
| पदार्थ विज्ञान | : प्रीती कुलकर्णी |
| गणित | : काझी ताझीन |
| संख्याशास्त्र | : समृद्धी चिद्रवार |
| प्राणिशास्त्र | : प्रणाली गावकर |
| वनस्पतिशास्त्र | : प्रणाली गावकर |
| फाउंडेशन कोर्स | : वृषाली मुळे |

#### एस. वाय. बी.एस्.सी.

| | |
|---|---|
| एकूण विद्यार्थी | - २४७ |
| उत्तीर्ण | - २२८ |
| एटीकेटीसह उत्तीर्ण | - ८ |
| अनुत्तीर्ण | - ६ |

राखीव निकाल - ५
टक्केवारी - ९२.३१ (एटीकेटी शिवाय)

प्रथम क्रमांक : कविता पाटील
द्वितीय क्रमांक: सैयद अब्दुल नासिर अब्दुल शफी
तृतीय क्रमांक : किरणदेवी पूनिया

विषयात प्रथम

रसायन शास्त्र : किरणदेवी पूनिया, रेश्मा तेंडुलकर
पदार्थविज्ञान : निवेदिता भगत
गणित : सैय्यद अब्दुल नासिर अब्दुल शफी
संख्याशास्त्र : कविता पाटील
प्राणिशास्त्र : किरणदेवी पूनिया
फाउंडेशन कोर्स : तनेशा पंजवानी, इनामदार सवाह महंमद हनिफ

**बारावीचा निकाल**

मार्च २००३ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेचा निकाल ४ जून २००३ रोजी दुपारी लागला. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातून सदर परीक्षेस बसलेल्या ३९९ विद्यार्थ्यांपैकी ३८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ९६.२४% निकालाचे विश्लेषण पुढील प्रमाणे-

| | |
|---|---|
| विशेष गुणवत्ता | १३६ विद्यार्थी |
| प्रथम वर्ग | १५८ विद्यार्थी |
| द्वितीय वर्ग | ७५ विद्यार्थी |
| तृतीय वर्ग | ९ विद्यार्थी |

धवल पट्टेकर ८९.५०% गुण मिळवून (५३७) महाविद्यालयातून पहिला आला.श्वेता गुप्ता ८८.८३% गुण मिळवून (५३३) द्वितीय तर प्रियांका कर्णिक ८८.६७% (५३२) गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

विषयवार सर्वाधिक गुण मिळवीणारे विद्यार्थी -

| | | |
|---|---|---|
| इंग्रजी - | दिव्या पै | ८९ |
| मराठी - | विकास बोटे | ८३ |
| हिंदी - | प्रियांका कर्णिक | ७६ |
| गणित - | धवल पट्टेकर | ९९ |
| पदार्थ विज्ञान- | म्हादगुल. रोशन | ९९ |
| रसायन शास्त्र - | सुवर्णा महाजन | ९७ |
| | नचिकेत रणदिवे | ९७ |
| | प्रांजल केळकर | ९७ |
| जीवशास्त्र- | श्वेता गुप्ता | ९९ |
| | अमृता जोशी | ९९ |

महाविद्यालयाचे प्राचार्य सी.डी. पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित, पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

**गीतेश शिंदे - वक्तृत्व स्पर्धेत यश**

शिवसेना ठाणे जिल्हा शाखा आयोजित व्यक्तिमत्व विकास व नेतृत्व गुण विकास शिबिरात बा. ना. बांदोडकर महाविद्यालयात द्वितीय वर्ष विज्ञान शाखेत शिकणाऱ्या गीतेश शिंदे यास वादविवाद स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले. ''सवर्णांना आरक्षण असावे'' हा विषय वादविवाद स्पर्धेसाठी होता.

तसेच उत्स्फुर्त वक्तृत्व स्पर्धेत गीतेशला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. खासदार श्री. सतिश प्रधान व माजी शिक्षणमंत्री श्री. सुधीर जोशी यांच्या हस्ते गीतेशला पारितोषिक प्रदान करण्यात आले.

या शिबीरात सुमारे २०० मुला-मुलींनी सहभाग घेतला होता.

•••